# कृषीवल

रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

१९३७-२०२६ ९० वर्ष

रायगड मंगळवार । दि. १८ ऑगस्ट २०२६ । अंक ७३ । पृष्ठे ८ । किंमत ५ ₹

। आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-28 । krushival.in


### महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षणाची संधी

**अलिबाग :** ग्रुप ग्रामपंचायत नागावच्यावतीने परिसरातील महिलांसाठी विविध कौशल्याधारित प्रशिक्षण कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. फोर व्हीलर ड्रायव्हिंग, आरीवर्क आणि ज्वेलरी मेकिंग या तीन प्रशिक्षणांचा महिलांना पूर्णपणे मोफत लाभ घेता येणार आहे. फोर व्हीलर ड्रायव्हिंगचे २१ दिवसांचे प्रशिक्षण २० महिलांसाठी आयोजित करण्यात आले असून, ड्रायव्हिंग लायसन्ससाठी आवश्यक असलेले लर्निंग लायसन्स काढण्यासाठीही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी आरटीओकडील संबंधित •➤पान २ वर

### तारापूर एमआयडीसीतील भीषण स्फोट

**पालघर :** बोईसर येथील तारापूर एमआयडीसी परिसरात असलेल्या विराज प्रोफाइल कंपनीत सोमवारी (दि.१७) सकाळी भीषण स्फोट झाला. काम सुरु असतानाच कंपनीत एकापाठोपाठ तीन भीषण स्फोट झाल्याचे समोर आले आहे. ही कंपनी तारापूर एमआयडीसीच्या एसएमएस वन या प्लांटमध्ये असून, भंगार वितळवून त्यापासून स्टील तयार करते. सोमवारी पहिल्या शिफ्टचे कामगार कंपनीत आल्यानंतर त्यांनी काम सुरु केल्यावर काहीवेळातच कंपनीतली फॅर्नेस टँकमध्ये स्फोट झाला. यावेळी कंपनीत सुमारे १५० कामगार हजर होते. या स्फोटात तीन कामगार जखमी असल्याची माहिती मिळाली आहे.

## वक्तव्ये वादात, टेंडर संशयात

# तरीही पालकमंत्रीपद हातात!

### महिलांच्या सन्मानाचा मुद्दा ते नाशिकच्या टेंडर प्रक्रियेवरील आरोप; अशा पार्श्वभूमीवर पालकमंत्रिपद कसे?

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

पालकमंत्री हे केवळ सत्तेतील प्रतिष्ठेचे पद नसून जिल्ह्याच्या विकासाचे, प्रशासनाच्या समन्वयाचे आणि जनतेच्या प्रश्नांचे नेतृत्व करणारी, मानसन्मान असलेली, उत्तम वक्तृत्व आणि संपूर्ण जिल्हा सांभाळण्याची जबाबदारी आहे. त्यामुळे व्यक्तीच्या सार्वजनिक भूमिकेपासून ते त्यांच्याभोवती निर्माण झालेल्या आरोपांपर्यंत प्रत्येक बाबीचा विचार करूनच अशा महत्त्वाच्या नियुक्त्या व्हायला हव्यात, अशी भूमिका शेकापने मांडली आहे.

#### सत्तेचे गणित की जनविश्वास?

रायगडमध्ये महिलांच्या सन्मानावरून वादग्रस्त वक्तव्याचा मुद्दा आणि नाशिकमध्ये कोट्यवधींच्या टेंडर प्रक्रियेवरील आरोपांची चर्चा ही दोन्ही प्रकरणे चर्चेत असतानाच दोन्ही नेत्यांना पालकमंत्रिपद देण्यात आले. त्यामुळे शेकापने सरकारला थेट सवाल केला. 'पालकमंत्री निवडताना जनतेचा विश्वास पाहिला की सत्तेचे गणित? सार्वजनिक प्रतिमा पाहिली की राजकीय सोय? पालकमंत्रिपद हे जनतेची जबाबदारी आहे. त्यामुळे सरकारने नियुक्तीचे निकष स्पष्ट करावेत आणि संबंधित आरोपांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी मागणी शेकापने केली आहे.

#### महाजनांच्या नियुक्तीवरही प्रश्न!

नाशिकच्या पालकमंत्रिपदावर गिरीश महाजन यांची नियुक्ती



झाली. मात्र, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी सुरू असलेल्या कोट्यवधी रुपयांच्या कामांच्या टेंडर प्रक्रियेबाबत तक्रारी आणि आरोप समोर आले आहेत. तक्रारदारांच्या दाव्यानुसार, ६०० ते ७०० कोटी रुपयांच्या टेंडर प्रक्रियेत अनियमितता झाल्याचा आरोप आहे. काही टेंडर अस्तित्वात नसतानाही पैसे घेतल्याचा दावाही करण्यात आला आहे. या तक्रारींच्या संदर्भात तनय महाजन यांचे नाव समोर येत असल्याचा दावा करण्यात आला आहे. तसेच, त्यांचा गिरीश महाजन यांच्याशी नातेसंबंध असल्याचा उल्लेख तक्रारींच्या मांडणीत करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी व्हावी, अशी मागणी शेकापने केली आहे.

सार्वजनिक जीवनातील वक्तव्ये, सर्व घटकांचा सन्मान, प्रशासनाशी समन्वय आणि जनतेसमोरची उत्तरदायित्वाची भूमिका या पदासाठी महत्त्वाची असताना वादग्रस्त वक्तव्ये आणि आरोपांच्या चर्चेत असलेल्या आ. भरत गोगावले व गिरीश महाजन यांच्या गळ्यातच पालकमंत्रिपदाची माळ घालण्यात आल्याने शेकापने सरकारवर थेट हल्लाबोल केला आहे. रायगडचे पालकमंत्री म्हणून भरत गोगावले यांच्या नियुक्तीवर शेकापने विशेषतः त्यांच्या वक्तव्यांचा संदर्भ देत आक्षेप घेतला आहे. महाडमधील एका कार्यक्रमात महिलांबाबत ''काम करणारा भाऊ पाहिजे की, ...बनवणारी बहीण पाहिजे'', अशा आशयाचे वक्तव्य केल्याचा आरोप गोगावले यांच्यावर झाला होता. या वक्तव्यामुळे महिलांच्या सन्मानाचा मुद्दा उपस्थित झाला होता. ज्यांच्या वक्तव्यामुळे महिलांच्या सन्मानावरून वाद निर्माण झाला, त्यांच्याच हातात संपूर्ण रायगडची धुरा देताना सरकारला महिलांच्या भावनांचा विचार करण्याची गरज वाटली नाही का? असा सवाल शेकापने उपस्थित •➤पान २ वर

## सरकारने हट्ट पुरविला

## झालो रे पालकमंत्री!

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

गेल्या अनेक महिन्यांपासून चर्चेत असलेल्या रायगडच्या पालकमंत्रिपदाचा तिढा अखेर सुटला असून, मंत्री भरत गोगावले यांची रायगडच्या पालकमंत्रिपदी नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे पालकमंत्रिपदाबाबत सातत्याने व्यक्त केलेला गोगावलेंचा दावा अखेर खरा ठरला आहे. 'मीच रायगडचा पालकमंत्री होणार....' गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या या आत्मविश्वासपूर्ण घोषणेला अखेर सरकारी आदेशाची साथ मिळाली. रायगडच्या पालकमंत्रिपदावर भरत गोगावले यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा झाल्याने त्यांच्या 'मीच'च्या राजकीय भूमिकेवर अखेर शिक्कामोर्तब झाले असल्याची चर्चा नाक्यानाक्यावर सुरु होती.




विशेष म्हणजे पालकमंत्रिपदाचा अधिकृत निर्णय होण्याआधीच गोगावले यांनी आपली भूमिका अनेकदा स्पष्ट केली होती. त्यामुळे निर्णयाची प्रतीक्षा सुरू असतानाही त्यांच्या वक्तव्यांमुळे रायगडच्या राजकारणात चांगलीच चर्चा रंगली होती. अखेर शासनाचा आदेश आल्यानंतर त्यांच्या आत्मविश्वासाला 'अधिकृत' अशी जोड मिळाली. •➤पान २ वर

## वे|ध|क

### उज्जैनच्या नागचंद्रेश्वर मंदिरात चेंगराचेंगरी

**उज्जैन :** श्रावण महिन्याच्या तिसऱ्या सोमवारी उज्जैनच्या महाकालेश्वर मंदिरात मोठ्या संख्येने भाविकांची गर्दी झाली. त्याचबरोबर वर्षांतून एकदाच उघडण्यात येणाऱ्या नागचंद्रेश्वर मंदिरातही दर्शनासाठी भक्तांची गर्दी झाली. दर्शनाला सुरुवात झाल्यानंतर थोड्याच वेळात बॅरिकेट्सजवळ गर्दी नियंत्रणाच्या बाहेर गेली. त्यामुळे मंदिर परिसरात चेंगराचेंगरी परिस्थिती झाली. मंदिरात असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांनी भाविकांना सुरक्षितपणे बाहेर काढले. त्यांनी जखमींना जवळच्या रुग्णालयातही दाखल केलं आहे. आतापर्यंत या घटनेत १३ भाविक जखमी झाल्याची माहिती हाती आली आहे.

### कुटुंबियांची हत्या करून आत्महत्या

**मुंबई :** कफ परेड येथील नेव्ही नगरात नौदलातील जवान पुरणमल शंभूलाल मेहरा (३०) याने पत्नी ओमा (२८), मुलगा यश (३) आणि दोन महिन्यांचा मुलगा दर्श यांची हत्या करून आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मेहरा यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या अवस्थेत, तर पत्नी व दोन्ही मुलांचे मृतदेह बेडरूममध्ये आढळले. कौटुंबिक व नोकरीतील तणावातून हे कृत्य केल्याचा प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत आहे. त्यांनी १४ ऑगस्टला रात्री वडिलांना ''येथे येऊन आमचे मृतदेह घेऊन जा,'' असा मेसेज पाठवला होता.

### वांद्रे कुटुंबीयांना ५० लाखाची मदत

**महाड :** एमआयडीसीतील इंडो अमाईन्स या रसायन कंपनीत शनिवारी (दि.१५) सायंकाळच्या सुमारास झालेल्या ट्रायफॉसजीन वायू गळतीच्या घटनेत परप्रांतीय अमित कुमार आणि बोरगाव गावातील कल्पेश वांद्रे यांचा मृत्यू झाल्याची घटना घडली. कल्पेश वांद्रे याच्या मृत्यूमुळे संतप्त स्थानिक ग्रामस्थांनी वांद्रे कुटुंबीयांना मदत देण्याबाबत आग्रही मागणी केली. त्यानंतर कंपनी व्यवस्थापनाने ग्रामस्थांशी चर्चा केली. या चर्चेनंतर अखेर वांद्रे कुटुंबीयांना पन्नास लाखाची मदत, तर त्याच्या पत्नीला महिना ११ हजार रुपयांची पेन्शन व मुलांच्या भवितव्यासाठी विचार करण्याचे आश्वासन कंपनी व्यवस्थापनाने दिले.



• अलिबाग तालुक्यातील आवास येथील नागेश्वर मंदिरात नागपंचमी उत्सण मोठ्या उत्साहात आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. मंदिरात दर्शनासाठी पहाटे पासूनच स्थानिकांसह परिसरातील भाविकांनी मोठी गर्दी केली. (छायाचित्रः समीर मालोदे)

## संभाजी महाराजांच्या पुतळ्यावरून पेणमध्ये संताप

### १३ ऑगस्टचा इशारा दुर्लक्षित; १७ ऑगस्टला पुतळा हटवण्याची नामुष्की

**। अलिबाग । विशेष प्रतिनिधी ।**

पेण नगरपालिकेने चिंचपाडा येथील चार फाटा चौकात छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने उभारलेल्या प्रतीकात्मक पुतळ्यावरून निर्माण झालेल्या वादाला अखेर जनतेच्या आक्रोशानंतर पूर्णविराम मिळाला. पुतळ्यामुळे छत्रपती संभाजी महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाचे विद्रुपीकरण झाल्याचा आरोप करत शिवभक्त आणि नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. वाढता विरोध लक्षात घेता प्रशासनाला अखेर हा पुतळा हटवावा लागला. मात्र, या प्रकरणात प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत.

पेणमधील काही सुज्ञ नागरिक आणि सह्याद्री प्रतिष्ठानचे शिवभक्त



दि.१३ ऑगस्ट रोजीच नगराध्यक्षांची भेट घेण्यासाठी गेले होते. पुतळा बसवू नये, महाराजांच्या व्यक्तिमत्त्वाला साजेसा पुतळा उभारावा आणि शिवभक्तांच्या भावना दुखावल्या जाऊ नयेत, अशी स्पष्ट भूमिका त्यांनी मांडली होती. मात्र, नागरिकांचा हा इशारा गांभीर्याने घेतला गेला नाही. अखेर अवघ्या काही दिवसांतच प्रशासनावर निर्णय मागे घेण्याची वेळ आली. दरम्यान, १३ ऑगस्टला इशारा मिळाला होता; तो ऐकला असता तर १७ ऑगस्टला पुतळा हटवण्याची वेळ आली असती का? असा सवाल आता पेणकरांकडून उपस्थित केला जात आहे. या घटनेनंतर नगराध्यक्षांनी व्हिडिओच्या माध्यमातून दिलगिरी व्यक्त केली. मात्र, केवळ दिलगिरी व्यक्त करून प्रकरण संपणार नसल्याची भूमिका नागरिकांकडून व्यक्त होत आहे. पुतळा बसवण्यापूर्वी त्याची प्रतिकृती कुणी पाहिली? त्याला मंजुरी कुणी दिली? नागरिकांच्या आक्षेपांकडे दुर्लक्ष का करण्यात आले? आणि या संपूर्ण प्रक्रियेत झालेला खर्च कोणाच्या जबाबदारीवर झाला, •➤पान २ वर

#### जबाबदारी कोणाची?

छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने चौक उभारताना अधिक संवेदनशीलता आणि गांभीर्य अपेक्षित होते. जनतेच्या पैशातून निर्णय घ्यायचा, नागरिकांच्या सूचनेकडे दुर्लक्ष करायचे आणि जनतेच्या संतापानंतर तो निर्णय मागे घ्यायचा, हा कारभाराचा पायंडा पडू नये. पुतळा हटवण्यात आला असला तरी या प्रकरणाने अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवले आहेत. पुतळा हटवणे हा जनतेच्या आंदोलनाचा विजय मानला जात असला, तरी या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आता केंद्रस्थानी आला आहे.

## आयकर विभागाच्या कार्यालयाला भीषण आग



**। मुंबई । प्रतिनिधी ।**

मुंबईतील चर्चगेटजवळील आयकर विभागाच्या कार्यालयाला सोमवारी (दि.१७) भीषण आग लागली. यावेळी अग्निशमन दलाच्या जवळपास ८ गाड्या घटनास्थळी तातडीने दाखल झाल्या. अग्निशन दलाच्या जवानांनी आग विझवण्याचे, ती आटोक्यात आणण्याचे शर्थीचे प्रयत्न केले. आग कशामुळे लागली ते कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. सुदैवाने यात कोणीही जखमी झाले नाही.

चर्चगेट स्टेशनजवळ असलेल्या आयकर विभागच्या कार्यालयाला लागलेल्या आगीमुळे चहूकडे धुराचे साम्राज्य पसरले होते. आग लागली तेव्हा आयकर विभागाच्या कार्यालयात काही कर्मचारी देखील होते; मात्र, आगीचे वृत्त समजताच त्यांना बाहेर काढण्यात आले. त्यामुळे काहीशी धावपळ उडाली होती. मिळालेल्या माहितीनुसार, या कार्यालयाच्या तळमजल्यावरच सोमवारी दुपारी ही आग लागली. शॉर्ट सर्किटमुळे आग लागली आणि बघता बघता आगीने रौद्ररुप धारण केले. आगीमुळे धुराचे मोठमोठाले लोट कार्यालयातून बाहेर पडताना दिसले. ज्या आयकर विभागच्या कार्यालयाला आग लागली, तेथील काही प्रत्यक्षदर्शींनी •➤पान २ वर

## माणगावातील आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

दक्षिण रायगडमधील हजारो सर्वसामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचे आरोग्य केंद्र असलेल्या माणगाव उपजिल्हा रुग्णालयातील आरोग्य व्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या ठिकाणी तज्ज्ञ डॉक्टरांची कमतरता, प्रशिक्षित मनुष्यबळाचा अभाव, उपलब्ध अत्याधुनिक वैद्यकीय यंत्रसामग्रीचा अपुरा वापर आणि गंभीर रुग्णांना उपचारासाठी अलिबाग अथवा मुंबईकडे पाठविण्याची वेळ यामुळे रुग्णांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागते. त्यामुळे ही पदे तातडीने भरावीत व नागरिक रुग्णांची गैरसोय टाळावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे श्रीवर्धन विधानसभा अध्यक्ष संताजी पवार यांनी केला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी जिल्हा




शल्य चिकित्सकांना दिले आहे.

माणगाव उपजिल्हा रुग्णालय हे सुमारे १०० खाटांची क्षमता असलेले महत्त्वाचे शासकीय रुग्णालय असून माणगावसह तळा, श्रीवर्धन, म्हसळा तसेच परिसरातील ग्रामीण व दुर्गम भागातील नागरिक उपचारासाठी या रुग्णालयावर मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे रुग्णालयातील आरोग्य सुविधा सक्षम करण्यासाठी तातडीने ठोस उपाययोजना कराव्यात, या मागणीसाठी संताजी पवार यांच्या नेतृत्वाखाली आरोग्य प्रशासनाला सविस्तर निवेदन देण्यात आले. यंत्रसामग्री उपलब्ध, मात्र तज्ज्ञ मनुष्यबळाचा अभाव शासनाने जनतेच्या पैशातून रुग्णालयात विविध अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे उपलब्ध करून दिली आहेत. मात्र, ही उपकरणे चालविण्यासाठी •➤पान २ वर

## कोयना प्रकल्पग्रस्तांची समिती कागदावरच

### पुनर्वसनाच्या प्रलंबित प्रश्नांमुळे नाराजी

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

कोयना धरणासाठी स्वतः च्या घरादारावर तुळशीपत्र ठेवून विस्थापित झालेल्या प्रकल्पग्रस्तांच्या पुनर्वसनाचे प्रश्न अद्यापही मार्गी लागले नसल्याने नाराजी वाढत आहे. प्रकल्पग्रस्तांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी स्थापन करण्यात आलेल्या समित्यांकडून अद्याप बैठकही घेण्यात आली नसल्याचा आरोप होत असून, त्यामुळे समित्या केवळ कागदावरच राहिल्याची भावना प्रकल्पग्रस्तांमध्ये आहे.

रायगड जिल्ह्यात कोयना प्रकल्पग्रस्तांच्या ४८ वसाहती असून, त्यापैकी खालापूर तालुक्यात सर्वाधिक २२ वसाहती आहेत. त्यानंतर पेण तालुक्यात १८, तर उरण तालुक्यात आठ वसाहतींमध्ये प्रकल्पग्रस्त वास्तव्यास आहेत. पुनर्वसनाच्या वेळी देण्यात आलेल्या आश्वासनांची अद्याप पूर्ण पूर्तता झालेली नसल्याने विविध मागण्यांसाठी प्रकल्पग्रस्तांना वारंवार शासन दरबारी खेटे मारावे लागत आहेत. प्रकल्पग्रस्तांना पर्यायी जमीन, नागरी सुविधा तसेच पुनर्वसनासाठी शिल्लक असलेल्या जमिनीच्या प्रश्नावर माजी मुख्यमंत्री तथा विद्यमान •➤पान २ वर

### हरतालिका, गणेश चतुर्थी एकाच दिवशी | तब्बल नऊ वर्षांनी असा योग

## यंदा बाप्पांचा १२ दिवस मुक्काम



**। रायगड । प्रतिनिधी ।**

यंदाचा गणेशोत्सव नेहमीप्रमाणे १० किंवा ११ दिवसांचा नसून थेट १२ दिवसांचा असणार आहे. दि.१४ सप्टेंबर रोजी बाप्पाचं आगमन होत असून, यंदा हरतालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी आल्याने तसेच तिथीच्या वाढीमुळे हा बदल घडून आला आहे. त्यामुळे गणेश भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. आता गणेशोत्सवाला एक महिन्याहून कमी कालावधी राहिला असून, गणेशोत्सवाची तय्यारी जोरदार सुरू आहे.

भाद्रपद शुक्ल चतुर्थीला घरोघरी गणपतीची प्राणप्रतिष्ठा केली जाते, तर सार्वजनिक गणपतीचे विसर्जन •➤पान २ वर

#### तिथीच्या गणितामुळे बदल

यंदा दि.१४ सप्टेंबर रोजी भाद्रपद शुक्ल तृतीयेच्या दिवशी म्हणजेच हरतालिकेच्या दिवशीच गणपती बाप्पांचे आगमन होत आहे. त्यामुळे तृतीयेपासूनच यंदा ही गणना करावी लागते. तृतीया ते अनंत चतुर्दशीपर्यंतचे दिवस मोजल्यास १४ सप्टेंबर ते २५ सप्टेंबर ते तब्बल १२ दिवस होतात. हिंदू धर्मातील सर्व सण हे तिथीनुसार साजरे केले जातात. कधी तिथीचा क्षय होतो, तर कधी तिथीची वृद्धी होते. यंदा गणेश चतुर्थी ही तृतीयेच्या दिवशी येत असल्याने, तृतीया ते अनंत चतुर्दशी असे तब्बल १२ दिवस होतात.

#### हा दुर्मिळ योग नाही

सोशल मीडियावर हा योग अनेक वर्षांनंतर आल्याचे सांगितले जात असले, तरी प्रत्यक्षात तसे काहीही नाही, हा केवळ समज आहे. तिथीची वृद्धी आणि क्षय यामागील जे लॉजिक असते, त्यानुसारच दिवसांमध्ये कमी-जास्तपणा होत असतो. त्यामुळे यंदाचा हा १२ दिवसांचा गणेशोत्सव कोणताही विशेष असा दुर्मिळ योग नाही, असे पंचागकर्त्यांनी स्पष्ट केले आहे.


MGM
Institute of Health Sciences
(Deemed to be University u/s 3 of UGC Act, 1956)
Grade "A++" Accredited by NAAC
Constituent College of MGM Institute of Health Sciences
MGM SCHOOL OF NURSING, VASHI
Admissions Open For
BSc Nursing
Nurse Practitioner in Critical Care (NPCC)
Nurse Practitioner in Emergency and Trauma Care (NPETC)
Enrol Before 31st August 2026



9321635842 Main Boardline | 9769803341 Human Resources (HR) | 9004052249 Principal
mgmsonvashi@gmail.com
Plot No. 35, Sector 3, Vashi, Navi Mumbai 400703
Affiliated Hospital
MGM
NEW BOMBAY HOSPITAL, VASHI
JCI & NABH ACCREDITED
A Multi-Speciality, Tertiary Care Hospital with a Legacy of Over 3 Decades

**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

**१८ ऑगस्ट**

१) श्री.तानाजी नारायण मयेकर श्रीबाग-३, अलिबाग, दि.१८-८-१९३६
२)श्री.रमेश नारायण शिंपी अलिबाग, दि.१८-८-१९५०
३)श्रीम.प्रेमलता विवेक कामत कामतआळी, अलिबाग दि.१८-८-१९५४

## तंटामुक्ती अध्यक्षपदी नामदेव वाघमारे

**सुकेळी :** रोहा तालुक्यातील नागोठणे जवळच असलेल्या ऐनघर ग्रामपंचायतीच्या तंटामुक्ती अध्यक्षपदी सुकेळी आदिवासीवाडी येथील युवा कार्यकर्ते नामदेव वाघमारे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. शुक्रवारी (दि.१४) झालेल्या ग्रामसभेत त्यांची नियुक्ती करण्यात आली. या ग्रामसभेला सरपंच कलावती कोकळे यांच्यासह सर्व सदस्य, विभागातील ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.



## पनवेल तालुक्यातील ग्रामपंचायतींना पुरस्कार

**नवीन पनवेल :** राज्य शासनाच्या महिला आणि बाल विकास विभागामार्फत राबवण्यात आलेल्या आदिशक्ती अभियान २०२५-२६ अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी घोषित करण्यात आलेल्या आदिशक्ती पुरस्कारांमध्ये पनवेल तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना पुरस्कार मिळाला आहे.

# वावे-बेंडसे पुलाची दुरवस्था




**। नेरळ । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुक्यातून वाहणाऱ्या उल्हास नदीवरील वावे आणि बेंडसे गावांना जोडणाऱ्या पुलाची दुरवस्था झाली आहे. या पुलाच्या दोन्ही बाजूंनी सुरक्षारक्षक म्हणून असलेल्या लोखंडी रेलिंग तुटले असून काही रेलिंग महापुराच्या पाण्यात वाहून गेल्या आहेत. त्यामुळे वाहनचालक आणि स्थानिक ग्रामस्थच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. वावे-बेंडसे पुलावरील तुटलेले रेलिंग अपघाताला निमंत्रण देणारे असून, सार्वजनिक बांधकाम विभाग लक्ष याकडे देतील का? असा सवाल वाहनचालकांकडून उपस्थित केला जात आहे.

कर्जत तालुक्यातील उल्हास नदीवरील वावे-बेंडसे पुलावरून दररोज मोठ्या प्रमाणात वाहनांची ये-जा सुरू असते. मात्र, पुलाच्या दोन्ही बाजूचे लोखंडी रेलिंग अनेक ठिकाणी तुटलेले व धोकादायक स्थितीत असल्याचे दिसून येत आहे. पुलाच्या बाजूला नदीचे पात्र असुन, तुटलेल्या रेलिंगमुळे अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. विशेषतः रात्रीच्या वेळी अथवा मुसळधार पावसात वाहन अनियंत्रित झाल्यास गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे वाहनचालक तसेच पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या पुलाचा वापर वावे, बेंडसे, पोसरी तसेच परिसरातील नागरिक मोठ्या प्रमाणात करतात. मात्र, पुलाच्या झालेल्या या दुरवस्थेमुळे वाहन चालकांचे तसेच पादचाऱ्यांचे जीव धोक्यात आले आहेत. त्यामुळे पुलावरील तुटलेले रेलिंग तातडीने दुरुस्त करून मजबूत संरक्षक कठडे बसविण्याची मागणी स्थानिक ग्रामस्थांनी केली आहे. एखादी दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने योग्य ती खबरदारी घेणे आवश्यक आहे. वावे-बेंडसे पुलावरील तुटलेले रेलिंग बांधकाम विभाग कधी दुरुस्त करणार, असा सवाल वाहनचालक तसेच पादचाऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे.

### अपघातानंतरच दुरुस्ती होणार का?

या पुलाच्या एका बाजूला वळणदार रस्ता आहे. सार्वजनिक बांधकाम विभाग तेथे अपघात होण्याची वाट पाहत आहे काय? तसेच अपघात झाल्यानंतरच दुरुस्ती होणार का? असा प्रश्न स्थानिक ग्रामस्थांनी उपस्थित करीत आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाने या गंभीर समस्येकडे तातडीने लक्ष देऊन पुलाची पाहणी करावी आणि तुटलेल्या रेलिंगची त्वरित दुरुस्ती करावी, अशी मागणी केली आहे.

## पान १ वरून

## महिलांसाठी कौशल्य प्रशिक्षणाची संधी

व्यक्ती दि.१८ ऑगस्ट रोजी उपस्थित राहणार आहेत. याशिवाय आरीवर्कचे पाच दिवसांचे आणि ज्वेलरी मेकिंगचे पाच दिवसांचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. या सर्व प्रशिक्षणांसाठी आवश्यक साहित्य प्रशिक्षणार्थींना मोफत उपलब्ध करून दिले जाणार असून, प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रमाणपत्रही देण्यात येणार आहे. या प्रशिक्षणांसाठी दि.१८ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहा ते दुपारी १२.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत नागाव येथे नोंदणी करण्यात येणार आहे. प्रत्यक्ष प्रशिक्षण वर्गांना दि.१९ ऑगस्टपासून सुरुवात होणार असून, दररोज दुपारी २.०० ते ६.०० या वेळेत वर्ग घेतले जाणार आहेत. ग्रामपंचायत हद्दीतील जास्तीत जास्त महिलांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घ्यावा आणि दि.१८ ऑगस्ट रोजी दिलेल्या वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात उपस्थित राहून नोंदणी करावी, असे आवाहन सरपंच हर्षदा मयेकर यांनी केले आहे.

## झालो रे पालकमंत्री!

रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटामध्ये जोरदार रस्सीखेच सुरू होती. मंत्री आदिती तटकरे आणि भरत गोगावले हे दोघेही या पदासाठी इच्छुक असल्याने नियुक्तीचा निर्णय लांबणीवर पडला होता. अखेर शासनाने गोगावले यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले. गोगावले यांनी यापूर्वी अनेकदा ''मीच रायगडचा पालकमंत्री होणार'' असा आत्मविश्वास व्यक्त केला होता. निर्णय प्रलंबित असतानाही त्यांनी आपल्या दाव्यावर ठामराहत राजकीय चर्चेला उधाण आणले होते. अखेर शासनाच्या अधिकृत निर्णयानंतर त्यांच्या दाव्यावर शिक्कामोर्तब झाले. दरम्यान, नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढाही सुटला असून, गिरीश महाजन यांच्याकडे नाशिकची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. रायगडच्या पालकमंत्रिपदावरून महायुतीतील घटक पक्षांमध्ये सुरू असलेली रस्सीखेच, स्थानिक राजकीय समीकरणे आणि निधीच्या नियंत्रणावरून सुरू असलेली चर्चा यामुळे या नियुक्तीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. अखेर आदेश आला आणि गोगावलेंचा दावा खरा ठरला. ''मीच पालकमंत्री होणार'' म्हणणारे गोगावले अखेर अधिकृतपणे पालकमंत्री झाले. आता उत्सुकता आहे ती पुढची... रायगडच्या विकासाच्या फाईली किती वेगाने हलणार आणि पालकमंत्रिपदाच्या माध्यमातून जिल्ह्याला काय मिळणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

**'मीच'चा एकपात्री प्रयोग अखेर यशस्वी ठरला!**

गोगावलेंच्या वारंवारच्या दाव्यांमुळे पालकमंत्रिपदाचा निर्णय होण्यापूर्वीच त्यांचे नाव चर्चेत राहिले. त्यामुळे आता अधिकृत नियुक्तीनंतर समर्थकांकडून ''आम्ही आधीच सांगितल होतं'' असा सूर उमटला. आता आदेशच हातात आल्याने समर्थकांना साहजिकच ''साहेबांनी आधीच सांगितलं होतं!'' म्हणण्याची संधी मिळाली. मात्र, एकपात्री प्रयोग यशस्वी झाला... आता रायगडच्या विकासाच्या नाटकात गोगावले संपूर्ण टीमसोबत मुख्य भूमिका कशी निभावतात, हे पाहणे औत्सुक्याचे ठरणार असल्याचे मत नागरिकांनी व्यक्त केले आहे.

## तरीही पालकमंत्रिपद हातात!

केला आहे. यापेक्षाही गोगावलेंच्या १५ ऑगस्टच्या वक्तव्याने राजकीय चर्चेला अधिक धार आली. ध्वजारोहणाच्या कार्यक्रमात त्यांनी ''काही दिवसांनी पालकमंत्रीपदाचा मान मिळेल, अशी शाश्वती आहे. आता अडचण, अडथळा राहिला नाही,'' असे म्हटले होते. अधिकृत निर्णय होण्यापूर्वीच पद मिळणार असल्याची 'शाश्वती' कुठून आली, असा सवाल आता उपस्थित होत आहे. अडथळा नेमका कोणाचा होता? कोणाच्या आक्षेपामुळे निर्णय रखडला होता? आणि तो अडथळा अचानक दूर कसा झाला? या प्रश्नांची उत्तरे सरकारने द्यावीत, अशी मागणीही शेकापने केली आहे.

## संभाजी महाराजांच्या पुतळ्यावरून पेणमध्ये संताप

याची उत्तरे प्रशासनाने जनतेला द्यावीत, अशी मागणी जोर धरत आहे.

पेण हे रायगड जिल्ह्यातील ऐतिहासिक आणि सांस्कृतिकदृष्ट्या महत्त्वाचे शहर असून, त्याच्या सांस्कृतिक ओळखीचा उल्लेखही जिल्ह्याच्या संदर्भांमध्ये आढळतो. त्यामुळे छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाने चौक उभारताना अधिक संवेदनशीलता आणि गांभीर्य अपेक्षित होते. जनतेच्या पैशातून निर्णय घ्यायचा, नागरिकांच्या सूचनेकडे दुर्लक्ष करायचे आणि जनतेच्या संतापानंतर तो निर्णय मागे घ्यायचा, हा कारभाराचा पायंडा पडू नये, अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त होत आहे. पुतळा हटवण्यात आला असला, तरी या प्रकरणाने अनेक प्रश्न अनुत्तरित ठेवले आहेत. पुतळा हटवणे हा जनतेच्या आंदोलनाचा विजय मानला जात असला, तरी या संपूर्ण प्रकरणाची जबाबदारी कोण घेणार? हा प्रश्न आता केंद्रस्थानी आला आहे.

''बुंद से गई, वो हौद से नहीं आती!'' पुतळा हटवता येतो, खर्चाचा हिशेब देता येतो; मात्र, पेणच्या प्रतिष्ठेला लागलेला डाग आणि दुखावलेल्या भावना केवळ दिलगिरीने पुसल्या जाणार का, याचे उत्तर आता प्रशासनाला द्यावे लागणार आहे.

## माणगावातील आरोग्य व्यवस्थेचा बोजवारा

आवश्यक तज्ज्ञ डॉक्टर, तंत्रज्ञ आणि प्रशिक्षित कर्मचारी पुरेशा संख्येने उपलब्ध नसतील, तर कोट्यवधी रुपयांच्या सुविधांचा सर्वसामान्य रुग्णांना प्रत्यक्ष लाभ कसा मिळणार, असा सवाल संताजी पवार यांनी उपस्थित केला. तसेच, आपत्कालीन परिस्थितीत अपघातग्रस्त व गंभीर रुग्णांना २४ तास तातडीची वैद्यकीय सेवा मिळावी आणि या सर्व मागण्यांवर आरोग्य प्रशासनाने कालबद्ध पद्धतीने कार्यवाही करून त्याबाबत लेखी माहिती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. प्रशासनाने या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहून तातडीने सुधारणा करावी. अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष जनतेला सोबत घेऊन लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारेल, असा इशाराही त्यांनी निवेदनातून दिला आहे. यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाचे रायगड जिल्हा सचिव श्रीहर्ष कांबळे, रायगड जिल्हा ओबीसी सेल अध्यक्षा अश्विनी ठाकूर, अलिबाग विधानसभा सरचिटणीस साईनाथ म्हात्रे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कोयना प्रकल्पग्रस्तांची समिती कागदावरच

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत दोन बैठका झाल्या होत्या. धरणासाठी संपादित झालेल्या जमिनीपैकी शिल्लक जमीन प्रकल्पग्रस्तांना परत देणे तसेच पर्यायी जमीन उपलब्ध करून देण्याबाबत या बैठकीत निर्णय झाल्याचे प्रकल्पग्रस्तांचे म्हणणे आहे.

या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी पुणे विभागीय आयुक्त आणि कोकण विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखाली समित्या स्थापन करण्यात आल्या. मात्र, समिती स्थापन होऊनही प्रकल्पग्रस्तांची एकही बैठक घेण्यात आलेली नसल्याने प्रशासनाच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. निर्णय होऊनही अंमलबजावणी होत नसल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष वाढत असून, आता आंदोलनाचा मार्ग स्वीकारण्याची तयारी सुरू आहे. दरम्यान, ''शासनाने प्रकल्पग्रस्तांचा अंत पाहू नये. आमच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत राहिल्यास आगामी काळात प्रकल्पग्रस्त रस्त्यावर उतरून भव्य आंदोलन उभारतील,'' असा इशारा अखिल कोयना पुनर्वसन सेवा संघाचे अध्यक्ष पवन कदम यांनी दिला आहे.

## यंदा बाप्पांचा १२ दिवस मुक्काम

अनंत चतुर्दशीला करण्यात येते. चतुर्थीपासून चतुर्दशीपर्यंतच्या याच तिथी असतात, कारण सर्व सण-वार हे तारखेवर नव्हे तर तिथीवर अवलंबून असतात. त्यामुळे चतुर्थी ते चतुर्दशी या तिथींचा समूह एकूण ११ तिथींचा होतो. काही वेळा किंचित वृद्धी होते, तर काही वेळा तिथीचा क्षय होतो. त्यामुळेच कधी गणपती १० दिवसांचे, तर कधी ११ दिवसांचे असतात. मात्र, यंदा १२ दिवस गणेशोत्सव साजरा होणार आहे. असा योग तब्बल नऊ वर्षांनंतर आला आहे. यापूर्वी सन २०१७ साली गणेशोत्सव १२ दिवसांचा आला होता. सोशल मीडियावर या १२ दिवसांच्या उत्सवाबाबत अनेक तर्क-वितर्क आणि दुर्मिळ योगाच्या चर्चांना उधाण आले आहे. मात्र, हा कोणताही अद्भूत किंवा दुर्मिळ योग नसून, केवळ तिथीच्या गणितामुळे झालेला हा बदल आहे, असा स्पष्ट खुलासा पंचांगकर्त्यांनी केला आहे. येत्या १४ सप्टेंबरपासून गणेशोत्सवाला सुरुवात होणार आहे. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून धार्मिक तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांच्या आयोजनाची जोरदार तयारी सुरू आहे. या १२ दिवसांच्या उत्सवाबाबत सोशल मीडियावर अनेक उलटसुलट चर्चा रंगल्या आहेत. यंदा हरतालिका आणि गणेश चतुर्थी एकाच दिवशी असल्याने त्याच दिवशी गणेशोत्सवाला सुरुवात होत आहे.

## आयकर विभागाच्या कार्यालयाला भीषण आग

त्यावेळची माहिती दिली. त्यांच्या सांगण्यानुसार, एक तासाभरापूर्वी शॉर्ट सर्किटमुळे आग लागली. आग लागल्यावर पहिल्या मजल्यावर दोन जण अडकले होते, पण ते कर्मचारी नव्हते, घाबरून ते एका रुममध्ये बसले होते, असेही प्रत्यक्षदर्शींनी सांगितले. दरम्यान, इनकम टॅक्सच्या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर काही जण अडकले होते, त्यांचे अग्निशमन दलाच्या जवानकडून रेस्क्यू ऑपरेशन करण्यात आले.

### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की,

आमचे अशिलांना मौजे मुळशी, ता. सुधागड, जि. रायगड येथील खाली वर्णन केलेली संपूर्ण मिळकत विद्यमान मालक श्री.बबन बाळकृष्ण पाटील रा.जोमा पाटील मार्ग, पाण्याचा टाकी जवळ, सेक्टर ०१, शिरवणे, नवी मुंबई, ठाणे यांचेकडुन खरेदी घेण्याचे ठरविले आहे. विद्यमान मालकांनी मिळकतीवरील त्यांचा मालकीहक्क निर्वेध असल्याचा भरवसा दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे मुळशी, ता. सुधागड, जि. रायगड येथील**

| भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे. आर. | आकार रु. पैसे |
|---|---|---|
| १/१ | ०-६२-०० <br> पो.ख ०-०७-८० <br> ०-६९-८० | ४.३८ |
| ५/८ | ०-११-८० <br> पो.ख ०-००-८० <br> ०-११-६० | १.५० |

व त्यामधील असलेले ग्रामपंचायत कळंब ता. सुधागड घर मालमता क्र. ५७४ आर सी सी बांधकाम १७१० चौ. फुट

वर नमूद मिळकतींमध्ये कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात, सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल मिळकत खरेदी घेण्याचा व्यवहार पुर्ण करतील, त्यानंतर येणाऱ्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक रहाणार नाहीत, हे सर्वांस कळावे.

अलिबाग
तारीख १७/०८/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक अलिबाग कार्यालयासमोर
पो. अलिबाग ता. अलिबाग जि. रायगड.

**अपर तहसिलदार व शेतजमीन न्यायाधिकरण अलिबाग यांचे न्यायालयात कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ याचे कलम १४ अन्वये पोट-कलम (१) या अन्वये द्यावयाची नोटीस**

**नोटीस** दावा क्रमांक ०१/२०२५

श्री. मंगेश अनंत आमले
रा. चोंढी, ता. अलिबाग वादी/अर्जदार
जि. रायगड
विरुध्द
श्री. दत्तु महादु कदम
रा. मुशेत, ता. अलिबाग प्रतिवादी/सामनेवाला
जि. रायगड

**विषय- मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन नियम १९५६ चे कलम १४ प्रमाणे**

**जमिनीचे वर्णन**

| गावाचे नाव | स.नं./हि.नं. | क्षेत्र हेक्टर आर | आकार रुपये पैसे |
|---|---|---|---|
| मौजे मुशेत, ता. अलिबाग | १३६ | ०-०१-३० | ०.०९ |

वादी/प्रतिवादी यांस या नोटीसीद्वारे कळविण्यांत येते की, वादी यांनी उपरोक्त नमुद मिळकतीची मुंबई कुळवहिवाट व शेतजमिन अधिनियम १९४८ व मुंबई कुळवहिवाट नियम १९५६ चे कलम १४ नुसार साधे कुळ म्हणून लागलेले नाव कमी करण्याबाबत न्यायालयात दि. १८/०७/२०२५ रोजी दावा/अर्ज दाखल केला आहे.

आता तुम्हास नियोजित कुळ हक्क समर्पित करणेविषयी काही सांगावयाचे असल्यास किंवा तिला हरकत घ्यावयाची असल्यास तारिख ०९/०९/२०२६ रोजी ११-०० वाजता तहसिल कार्यालय अलिबाग येथे शेतजमीन न्यायाधिकरणा पुढे हजर होण्याविषयी तुम्हांस न्यायाधिकरण यावरुन फर्मावीत आहे जर नेमलेल्या वेळी व ठिकाणी न्यायाधिकरणापुढे हजर होण्याविषयी तुम्ही कसूर कराल तर त्या बाबतीत तुम्हांस काहीही सांगावयाचे नाही असे गृहीत धरण्यात येईल आणि आवश्यक त्या चौकशीच्या कामास तुमच्या गैरहजेरीत सुरुवात करण्यात येईल. आपण सदर सुनावणीस हजर न रहिल्यास उपलब्ध असलेल्या कागदपत्रानुसार निकाल/निर्णय देणेत येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण :- अलिबाग
दिनांक :- १३/०८/२०२६

सही/-
**(विक्रम पाटील)**
अपर तहसिलदार व शेतजमिन न्यायाधिकरण
अलिबाग- रायगड

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वरंडे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भूषण लक्ष्मण कदम व इतर रा. चौल सागमळा, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नांवे असलेल्या भातशेती मिळकती माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. त्याबाबत तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| | मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वरंडे <br> ता. अलिबाग | १२७ | <br> पो.ख. <br> एकूण | ०-४२-५० <br> ०-०२-८० <br> ०-४५-३० | १०.२३ |
| २ | वरंडे <br> ता. अलिबाग | १३१/३ | <br> पो.ख. <br> एकूण | ०-७८-५० <br> ०-०५-८० <br> ०-८४-३० | १४.८३ |
| ३ | वरंडे | ५५३/२ | <br> पो.ख. <br> एकूण | ०-२०-४० <br> ०-००-०० <br> ०-२०-४० | ०.३५ |

सबब सदरहू शेती मिळकत निर्वेध असल्याचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. या उपरही सदरहू वरकस मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून ०७ (सात) दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. अन्यथा सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहेत असे गृहीत धरुन माझे अशील वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : १७/०८/२०२६

सही/-
**ॲड. शैलेश प्रभाकर पाटील**
दुय्यम निबंधक कार्यालयासमोर गाळा नं. ३,
अलिबाग, ता. अलिबाग, जि. रायगड.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**E-TENDER NOTICE**

MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website **https://srmetender.mahatransco.in** for the following Tender specification. Tender fees Rs. 500/- + GST

| Sr.No. | Particulars | Description |
|---|---|---|
| 1 | Tender No. & Name of Tender | **RFx No. :- 7000041170** <br> **Tender No.: EE/EHV(O&M)/DN/PNL/e-Tender-30/2026-2027** <br> RFx e-tender for attending oil leakage from various joints of EHV Power Transformer /ICT at various substation under EHV (O&M) Division Panvel by using latest technology "power seal online gasketing. <br> **Tender amount Limited to Rs. 10,00,000/-,** <br> **EMD amount Rs. 10,000/-** |
| 2 | Online Downloading the RFx | **17.08.2026, 18:00 Hrs. to 01.09.2026, 23:59 Hrs.** |
| 3 | Online Submission of the RFx | **On or Before 01.09.2026 up to 23:59 Hrs.** |
| 4 | Online Opening of the **Techno Commercial RFx** | **02.09.2026 at 11:00 hrs. (if Possible)** |

For further details visit our website :- **https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person :-** The Dy. Executive Engineer, (O): Mobile No. 9769894505.
**Note :** All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**SD/-**
**Executive Engineer,**
**E.H.V. (O&M) Dn. Panvel**

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे. जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क-** ८०५५३२५६७८ **(बीपीन राठवा)**
९२२६०५५१५५ **(अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**



**सौ सिंधू शेलेंद्र काळे, स्मृतीदिन अलिबाग**



**निलेश घरत, वाढदिवस स्मृतीदिन , अलिबाग**

### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविणेत येते की, कृष्णा गजानन गुजरे व विभावरी कृष्णा गुजरे यांनी त्यांचे खुद्द मालकीची व ताबे कब्जा वहिवाटीची, मौजे भादाणे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील गट नं. ९२/१, एकूण क्षेत्र ०.५०.०० हे.आर. (आकार रू.पै. ९.८०) हे.आर. ही मिळकत योग्य त्या खरेदीदारास विकण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीच्या उतारी मालक कब्जेदार म्हणून कृष्णा गजानन गुजरे, व विभावरी कृष्णा गुजरे यांची नावे दाखल आहेत. तरी, सर्व लोकांस या नोटीसने असे कळविणेत येते की, वर नमूद केलेल्या मिळकतीत कृष्णा गजानन गुजरे, व विभावरी कृष्णा गुजरे यांचे व्यतिरिक्त अन्य कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, लिज, लीन, वहिवाट वगैरे कोणताही कसलाही हक्क हितसंबंध असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १५ (पंधरा) दिवसांचे आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह, लेखी स्वरूपात आपल्या हरकती खाली सही करणार यांचेकडून आणून द्याव्यात. सदर विहित मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत खाली सही करणार यांचेकडे न आल्यास, सदर मिळकती या निर्वेध आहेत असे समजून सदर विद्यमान मालक योग्य त्या खरेदीदारासोबत विक्री व्यवहार पूर्ण करतील व मग मागाहून येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व ती विद्यमान मालक व त्यांचे खरेदीदारावर बंधनकारक देखील असणार नाही, याची सर्वांनी स्पष्ट नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.

अलिबाग
तारीख : १८/०८/२०२६

सही/-
**ॲड. अमित विष्णु राऊळ**
रा. सातिर्जे, पो. मापगाव
ता. अलिबाग, जि. रायगड
मोबा नं. ८६९८०००२३८

**उपविभागीय अधिकारी रोहा, उपविभाग रोहा यांच्या न्यायालयात**

### जाहीर नोटीस

**आरटीएस विलंबमाफी क्र.६२/२०२६**

१. श्री. अशिष किसन मोरे **अपिलार्थी**
२. श्री. आकाश किसन मोरे
रा. ऐनव्हाळ, ता. रोहा, जि. रायगड

**विरूद्ध**

१. श्री. सचिन विठोबा उफाळे,
रा. आर. सी. मार्ग, अशिष सिनेमा जवळ,
जे.जे. वाडी, मारवली चर्च, एफसीआय मुंबई ४०००७४
२. श्री. राजेश यशवंत उफाळे,
रा. हॉटेल गोल्डन चारयट, विराल अपार्ट.,
एस. व्ही. रोड, शॉपर्स स्टॉप समोर, अंधेरी पश्चिम, मुंबई
३. श्री. राकेश यशवंत
४. अंजना यशवंत उफाळे,
क्र. ३ व ४ रा. तोरंकेवाडी, गोमाशी,
पो. नांदगाव, ता. सुधागड, जि. रायगड
५. श्री.अनिल गंगाराम उफाळे, रा. तोरंकेवाडी, पो.नांदगाव,
ता. सुधागड, जि. रायगड
६. श्री. गायत्री गणेश खडकर,
रा. तोकेवाडी, गोमाशी पो. नांदगाव, **उत्तरार्थी**
ता. सुधागड, जि. रायगड
७. सी. लक्ष्मी न जाधव पुर्वाश्रमीची इंदिरा गंगाराम उफाळे,
रा. फणसवाडी, पो. नांदगाव, ता. सुधागड, जि. रायगड
८. सौ. मालती मोरे.
रा. साई निवास, जय शिव साई सह गृह संस्था
मर्या., सिध्दार्थ नगर, बांद्रे पूर्व, मुंबई ४०००५१
९. श्रीमती वंदना विठोबा उफाळे,
१०. सपना विठोबा उफाळे
११. रत्ना विठोबा उफाळे
नं.९ ते ११ रा.आर.सी.मार्ग, अशिष सिनेमा जवळ
जे.जे. वाडी, मारवली चर्च, एफसीआय मुंबई ४०००७४
१२.सुवर्णा संदिप मांढरे
रा.रूम नं.१२०, जे.जे.वाडी, मारोली चर्च, माहुल रोड,
आशिष सिनेमाजवळ, चेंबुर एफसीआय, मुंबई ४०००७४
१३. श्री.नरेश गोविंद यादव,
रा.सिद्धेश्वर बुद्रुक, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
१४. श्री.प्रविण चंद्रकांत शिंदे
१५. सौ. अपर्णा प्रविण शिंदे
नं.१४ व १५ दोघेही रा. सह्याद्री नगर,
बी. आर. सी. मार्ग, वाशी नाका, चेंबुर, मुंबई ४०००७४ **उत्तरार्थी**
१६. श्री. अवनिश राजन
रा. फ्लॅट नं. ई- २. ९०८, गोल्फ कोर्स विस्तार मार्ग,
विभाग ६०, गुरगाव विभाग ५६, हरियाणा १२२०११
१७. प्रेरणा रुममानंद नेवगी,
रा. ए १/७०४, साई गौरव, खांदक पाडा,
साई चौक, कल्याण पश्चिम, ठाणे- ४२१३०१
१८. श्री. योगेश चंद्रकांत भऊड,
रा. पाली, शिळोशी रोड, तहसिल गोडाऊन मागे,
पाली, ता. सुधागड, जि. रायगड ४१०२०५
१९. आसिफ इस्माईल खान,
२०. नासिर इस्माईल खान,
नं. १९ व २० रा. लिंक रोड, उमा नगर,
मालाड पश्चिम मुंबई ४०००६४
२१. अरविंद खिमजी छेडा,
रा. ए ६०१, निलम नगर, गवाणपाडा,
मुलुंड पूर्व मुंबई ४०००८१
२२. ग्राम महसुल अधिकारी सजा नांदगाव
ता. सुधागड, जि. रायगड
२३. मंडळ अधिकारी नांदगाव,
ता. सुधागड, जि. रायगड

सर्व संबंधितांस या नोटीशीद्वारे सूचित करण्यात येते कि, अपिलार्थी यांनी या न्यायालयात महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये मौजे गोमाशी, ता. सुधागड येथील गट नं. १९९, ३३४, ३५२, ३६१, ३७० ३७९, ३८१, ३८८, ४१२, ४१५, ४३३, ४४७ व ४५२ या मिळकतीबाबत फेरफार क्र. ८६६, २७०, १२२२, १३०३, १३२० व १४४५ च्या विरोधात अपिल दाखल केले आहे.

सबब, या जाहीर नोटीशीद्वारे तमाम संबंधितांना कळविण्यात येते की या अपिलाकामी सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. तरी संबंधितांनी दिनांक १०/०९/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता स्वतः अथवा वकीलामार्फत या न्यायालयात लेखी पुराव्यासह हजर रहावे नमूद तारखेस हजर न राहिल्यास सदर अपिलामध्ये गुणवत्तेवर एकतर्फी आदेश पारित करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदरहू नोटीस माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली असे.

दि. १३/०८/२०२६

दिनांक- १३/०८/२०२६

सही/-
**उपविभागीय अधिकारी रोहा**
**उपविभाग रोहा**

## स्वातंत्र्यदिनी शाळेत

# ‘तिरंगा’ फडकवलाच नाही

■ विद्यार्थी संख्या शून्य झाल्याने शाळा बंद

■ प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळे नागरिकांचा संताप



**शाळा बंद झाली म्हणजे तिचे अस्तित्व संपले का?**

राष्ट्रध्वज फडकवण्याइतका वेळ प्रशासनाकडे का नसावा? या निष्काळजीपणाला जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शिक्षण विभाग काय कारवाई करणार?असे अनेक उद्विग्न प्रश्न आता ग्रामस्थ विचारत आहेत.

**| पाली | प्रतिनिधी |**

एकेकाळी ज्ञानदानाचे पवित्र मंदिर असलेली आणि शेकडो उच्चशिक्षित नागरिक घडवणारी १० दशके (१०० वर्षे) जुणी रायगड जिल्हा परिषद शाळा भेरव यंदा एका वेगळ्याच दुर्दैवी कारणाने चर्चेत आली आहे. ८० व्या स्वातंत्र्यदिनाचा उत्साह देशभरात ओसंडून वाहत असताना, या ऐतिहासिक शाळेत मात्र, या वर्षी देशाचा राष्ट्रध्वज तिरंगा फडकवलाच गेला नाही! प्रशासनाच्या या अक्षम्य दुर्लक्षामुळे स्थानिक नागरिक, माजी विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये प्रचंड संतापाची लाट पसरली आहे.

जिल्हा परिषद शाळा केवळ एक इमारत नसून परिसराची अस्मिता होती. गेल्या १०० वर्षांत या शाळेने हजारो विद्यार्थ्यांना शिक्षणाची कवाडे उघडून दिली.

एकेकाळी या शाळेला ‘केंद्र शाळा’ म्हणून दर्जा मिळालेला होता. या शाळेतून शिकून बाहेर पडलेले अनेक माजी विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत उच्च पदांवर कार्यरत आहेत, तर काहींनी परदेशातही आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला आहे. या शाळेच्या भिंतींशी गावातील ज्येष्ठ नागरिकांच्या आणि माजी विद्यार्थ्यांच्या आठवणी आणि भावना घट्ट जोडलेल्या आहेत.

काळाच्या ओघात खासगी इंग्रजी माध्यमांच्या शाळांचे पीक आले आणि दुर्दैवाने या ऐतिहासिक सरकारी शाळेची विद्यार्थी संख्या घसरत गेली. यंदा पटसंख्या ‘शून्य’ झाल्यामुळे प्रशासकीय नियमांनुसार ही शाळा बंद पडली. वर्गखोल्या शांत झाल्या, मुलांचा किलबिलाट थांबला; पण शाळेचा इतिहास आणि तिचे अस्तित्व गावकऱ्यांच्या मनात कायम होते. शाळा बंद असली, तरी १५ ऑगस्ट हा राष्ट्रीय सण असल्याने आणि इमारत शासकीय असल्यामुळे तिथे ध्वजारोहण होणे अपेक्षित होते.

मात्र, शिक्षण विभाग आणि स्थानिक प्रशासनाच्या ढिम्म कारभारामुळे या ८० व्या स्वातंत्र्यदिनी शाळेच्या आवारात तिरंगा फडकवलाच गेला नाही.

> “या शाळेने आम्हाला घडवले. आज पटसंख्या नाही म्हणून शाळा बंद झाली हे दुःख आहेच, पण स्वातंत्र्यदिनी आपल्याच शाळेत तिरंगा फडकू नये, एवढा निष्काळजीपणा प्रशासन कसा करू शकतो? हा आमच्या भावनांवर आणि देशाच्या ध्वजाचा एक प्रकारे केलेला अपमान आहे.”
>
> – अविश पवार, माजी विद्यार्थी, दुबई.

> “भेरव शाळेत विद्यार्थी नसल्याने बरेच दिवसांपासून शाळा बंद आहे. त्यामुळे त्याठिकाणी शिक्षक देखील उपलब्ध नाहीत. विद्यार्थी नसल्याने ध्वजारोहण कोणासाठी करायचे त्यामुळे त्याठिकाणी स्वातंत्र्यदिन साजरा करण्यात आला नाही.”
>
> – सादुराम बांगारे, गट शिक्षणाधिकारी पाली सुधागड.



# कामोठ्यातील शिवमंदिरात गर्दी

**| खांदा कॉलनी | प्रतिनिधी |**

श्रावण महिन्याच्या पहिल्या सोमवारी कामोठे परिसरातील प्राचीन शिवमंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली. पहाटेपासूनच भगवान शिवाच्या दर्शनासाठी मंदिराबाहेर भाविकांच्या रांगा लागल्या होत्या. महिला, पुरुष तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित होते. पहाटे मंदिरात शिवलिंगावर अभिषेक व विधिवत पूजा करण्यात आली. भाविकांनी बेलपत्र, फुले, दूध आणि जल अर्पण करून महादेवाचे दर्शन घेतले. श्रावणी सोमवार असल्याने मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ‘नमः शिवाय’, ‘हर हर महादेव’ आणि ‘जय जय भोलेनाथ’च्या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला होता. अनेक भाविकांनी उपवास करून महादेवाच्या चरणी आपली श्रद्धा अर्पण केली. दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये श्रावणातील पहिल्या सोमवारी विशेष उत्साह दिसून आला. मंदिर परिसरात सकाळपासूनच भाविकांची वर्दळ वाढली होती. शिवभक्तांनी मनोभावे पूजा-अर्चा करून सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. अनेक भाविकांनी कुटुंबासह मंदिरात उपस्थित राहून भगवान शिवाचे दर्शन घेतले.

## निवडक

### वाहतूक पोलिसांकडून माणुसकीचे दर्शन

**नवीन पनवेल :** चार चाकी गाडीचा फुटलेला टायर



बदलण्यासाठी पनवेल वाहतूक शाखेचे पोलीस नाईक यांनी वाहनचालकाला रात्रीच्या वेळेस मदत केली. यावेळी कारमधील नागरिकांनी पोलिसांचे आभार मानले. पहाटे साधारण साडेतीन ते पावणेचारच्या सुमारास एका रेंज रोव्हर कारचा अचानक टायर फुटला. यावेळी कारमध्ये दोन व्यक्ती होत्या. मात्र त्यांना वाहनाचा टायर बदलता येत नसल्याने ते काही काळ अडचणीत सापडले. यावेळी वाहतूक पोलीस त्या ठिकाणाहून पेट्रोलिंग साठी जात होते. ही बाब लक्षात येताच पनवेल वाहतूक पोलीस निरीक्षक औदुंबर पाटील यांनी तातडीने परिस्थितीची दखल घेत मार्गदर्शन केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक केशव निकम यांनी पुढाकार घेत वाहनाचा टायर बदलण्यासाठी मदत केली. पोलिसांबद्दल नागरिकांच्या मनात विश्वास निर्माण करणारी ही कृती आहे, अशा भावना संबंधित कारचालकाने व्यक्त केल्या.

### खोपटा, कोप्रोलीला वाहतूक कोंडींचे विघ्न

**चिरनेर :** ग्रामीण भागातील २५ गाव आणि सुमारे २० एम्टी कंटेनर यार्डशी जोडणाऱ्या खोपटा-कोप्रोली-चिरनेर रस्त्यांवरील महत्त्वाचा दुवा असलेल्या जुन्या खोपटा पुलाचे काम रखडले आहे.पुलाच्या रखडलेल्या कामामुळे मात्र, या मार्गावर दररोज वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होत आहे. पुलावर सातत्याने होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे मात्र हजारो प्रवासी, नागरीक, विद्यार्थी, अवजड कंटेनर वाहतूकदार, वाहनचालक त्रस्त आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेला खोपटा-कोप्रोली दरम्यानचा जुना पूल आहे. वाढती रहदारी व वाढत्या अवजड कंटेनर मालाच्या वाहतुकीसाठी जुना पूलावरील वाढता ताण कमी करण्यासाठी या जुन्या पुलाला समांतर असा आणखी एक नवा पुल उभारण्यात आला आहे. त्यामुळे या जुन्या पुलाच्या दुरुस्तीचे काम वर्षभरापासून सुरू असल्याने वाहतूकीसाठी बंद करण्यात आला आहे. यामुळे सध्या एकाच पुलावरुन वाहतूक सुरू आहे. उरण तालुक्यातील ग्रामीण भागातील २५ गावांना जोडणारा खोपटा पुल एकमेव मार्ग आहे. त्याच बरोबर खोपटा, कोप्रोली, चिरनेर, वशेणीपर्यंत ट्रान्स इंडिया, कॉन्टिनेटल, अमेया लॉजीस्टिक, न्यू ट्रान्स इंडिया, विरगो, ग्लोबीकॉन, अलकार्गो, कारवान आदी कंपन्यांची सुमारे २० हुन अधिक कंटेनर यार्ड आहेत.पुलावरून सातत्याने अवजड कंटेनर, हलक्या, तीनचाकी, दुचाकी वाहनांची अहोरात्र वर्दळ सुरू असते. त्यातच खोपटा पुलावरच मोठमोठे खड्डे पडले आहेत. या व्यतिरिक्त खोपटा-कोप्रोली- चिरनेर रस्त्यांचीही दुरवस्था झाली आहे. त्यामुळे खोपटा पुलापासून कोप्रोली रस्त्यावर सातत्याने वाहतूक कोंडीची समस्या निर्माण होऊ लागली आहे.

# भातशेतीच्या लागवडीची कामे अंतिम टप्प्यात

**| चिरनेर | प्रतिनिधी |**



उरण तालुक्यात भातशेती लावणीचीकामे अंतिमटप्प्यात आली आहेत. सध्या बळीराजा भात शेती लागवडीच्या कामात व्यस्त असून, येत्या चार दिवसात तालुक्यातील लावणीची कामे पूर्णत्वास जातील अशी माहिती येथील शेतकऱ्यांनी दिली. यंदा पावसाने उशिरा हजेरी लावून पुन्हा मध्येच दडी मारल्याने शेतीच्या कामात अनेक अडचणी निर्माण झाल्या. शेतकऱ्यांना धूळ वाफेवरची पेरणी करताच आली नाही. बहुतेक शेतकऱ्यांनी चिखल पेरा केला होता. यंदा पावसाने चांगलेच रंग दाखविल्याने शेतकऱ्यांना दुबार-तिबार पेरणी करावी लागली. त्यामुळे भात रोपे लावणी योग्य तयार होण्यास अडथळे निर्माण झाले. भात लागवडीच्या कामांना सुरुवात झाल्यावर पावसाने मध्येच पुन्हा दडी मारली. त्यामुळे शेतात पुरेसे पाणी नसल्यामुळे भात लागवडीच्या कामांना अपेक्षित गती मिळत नव्हती. अखेर मंगळवारी (दि.११) पावसाने जोरदार हजेरी लावली. त्यामुळे भात लागवडीच्या कामांना पुन्हा एकदा गती आली. सध्या भात लावणीची कामे अंतिम टप्प्यात आली असून, येत्या चार दिवसात तालुक्यात लावणीची कामे पूर्णत्वास जातील असा अंदाज येथील शेतकऱ्यांनी व्यक्त केला आहे.

दरम्यान, कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली शेतकरी वर्ग सामूहिक शेतीकडे वळला असून, तालुक्यात भातशेती क्षेत्रात तंत्रज्ञानाचा शेतकरी वापर करत, चारसूत्री भात लागवड, सामूहिक शेती भात लागवड, बचत गटाने केलेली सामुहीकरीत्या लागवड अशा प्रकारच्या पद्धतीने येथील शेतकऱ्यांनी भात शेतीची लागवड केली आहे. या तंत्रामुळे अनेक दृष्टीने वेळ व मजुरांची बचत होते. त्याचबरोबर उत्पादनात वाढ होत असल्याचे येथील शेतकऱ्यांनी सांगितले आहे.

### लग्नाचे आमिष दाखवून फसवणूक

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

अल्पवयीन तरुणीसोबत शारीरिक संबंध ठेवून ती गरोदर राहिली आणि तिच्यासोबत लग्न न करता फसवणूक केल्याप्रकरणी अरबाज सलीम शेख (वय २६ राहणार वडघर) याच्या विरोधात पनवेल शहर पोलीस ठाण्यात १४ ऑगस्ट रोजी पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. यातील अल्पवयीन तरुणी सोबत अरबाज शेख याने शारीरिक संबंध ठेवून फोटो घरच्यांना पाठवण्याची धमकी दिली आणि तिच्यासोबत पुन्हा वारंवार शरीर संबंध ठेवले आणि लग्नाचे आमिष दाखवून तिची फसवणूक केली.

### उधारीचे पैसे मागितल्याने मारहाण

**| नवीन पनवेल | प्रतिनिधी |**

सिगारेटचे आणि मागील उधारीचे पैसे मागितल्याने त्याचा राग मनात धरून दोघांना मारहाण केल्याचा प्रकार खारघर येथे उघडकीस आला. या प्रकरणी हरनेक सिंग पन्नू उर्फ बिल्लू (राहणार खारघर देवदर्शन बिल्डिंग) याच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात १४ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादी हरिराम यादव हे खारघर, सेक्टर १९ येथे राहत असून १३ ऑगस्ट रोजी रात्री सव्वा अकराच्या सुमारास ते आणि रवींदर हे पान टपरीवर काम करत होते. पान टपरी समोरील देवदर्शन करून बिल्डिंग येथे राहणार हरनेक सिंग यांनी त्या ठिकाणी सिगारेट घेतला त्याच्याकडून सिगारेटच्या आणि मागच्या उधारीचे पैसे मागितल्याने त्याने हरिराम याला शिवीगाळ आणि मारहाण केली. तसेच रवींदर याला फरशीने डोक्याला आणि नाकाला मारहाण केली. यात दोघेही जखमी झाले असून त्याचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

# पी.एन.पी महाविद्यालयाकडून तिरंगा रॅली



**| अलिबाग | प्रतिनिधी |**

प्रभाकर पाटील एज्युकेशन सोसायटीच्या कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाकडून ८० व्या स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी सर्वप्रथम इतिहास विभागाचे प्रा. साईनाथ पाटील यांनी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास सांगितला, त्यानंतर विद्यार्थ्यांनी तिरंगा हातात घेऊन रॅलीमध्ये सहभाग नोंदवला. भारत माता की जय, वंदे मातरम अशा देशभक्तीपर घोषणा देऊन विद्यार्थ्यांनी स्वातंत्र्य दिनाचा जल्लोष साजरा केला. या कार्यक्रमाचे आयोजन आणि नियोजन महाविद्यालयातील इतिहास विभाग आणि राष्ट्रीय सेवा योजना विभागाने केले होते. सदर तिरंगा रॅलीमध्ये महाविद्यालयातील शिक्षक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.




# खारकांड मोहल्ल्यातील खड्डे बुजवण्यास सुरुवात




**| महाड | प्रतिनिधी |**

महाडमधील खारकांड मोहल्ला येथील कवे आली कॉर्नर ते देशमुख नर्सिंग हॉस्पिटलपर्यंतच्या रस्त्याची झालेली दुरवस्था आणि पाईपलाईनच्या कामानंतर निर्माण झालेल्या मोठमोठ्या खड्ड्यांबाबत ‘कृषीवल’ने ठळकपणे वृत्त प्रसिद्ध करून प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या वृत्ताची संबंधित महाड नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ दखल घेतली असून रस्त्यावरील खड्डे बुजवण्याच्या कामास सुरुवात करण्यात आली आहे.

पाण्याच्या पाईपलाईनचे काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्याची योग्य प्रकारे डागडुजी न झाल्याने या मार्गावर मोठमोठे खड्डे निर्माण झाले होते. त्यामुळे नागरिक, वाहनधारक तसेच रुग्णालयाकडे ये-जा करणाऱ्या रुग्णांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. विशेषतः दुचाकीस्वारांसाठी हा रस्ता धोकादायक बनला होता.

या गंभीर समस्येबाबत जमातुल मुस्लिमीन खारकांड मोहल्ल्याचे अध्यक्ष मुख्तार अकबर अली तरे यांनी प्रशासनाकडे तातडीने रस्ता दुरुस्तीची मागणी केली होती. तसेच चार दिवसांच्या आत रस्त्याची दुरुस्ती न झाल्यास नागरिकांना सोबत घेऊन नगरपरिषदेवर आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला होता.

दरम्यान, ‘कृषीवल’मध्ये या समस्येचे वृत्त प्रसिद्ध होताच संबंधित नगरपरिषद प्रशासनाने तात्काळ लक्ष देत रस्त्यावरील खड्डे बुजवण्यास सुरुवात केली आहे. त्यामुळे परिसरातील नागरिकांकडून समाधान व्यक्त करण्यात येत असून, वृत्तपत्राच्या माध्यमातून मांडलेल्या नागरिकांच्या समस्येची प्रशासनाने दखल घेतल्याचे दिसून येत आहे. ‘कृषीवल’च्या वृत्ताची दखल घेत प्रशासनाने तातडीने केलेल्या कार्यवाहीबद्दल स्थानिक नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

# महाराष्ट्राची नामुष्की

एक काळ असा होता की महाराष्ट्रातील कारभार देशात सर्वात चांगला असल्याचे मानले जायचे. रिझर्व्ह बँक किंवा इतर संस्थांनी घालून दिलेल्या मर्यादा पाळल्या जायच्या. कर्जाचे प्रमाण धोका रेषेच्या कितीतरी खाली असायचे. भाजपच्या सरकारने हा सगळा लौकिक पार धुळीला मिळवला आहे. राज्य सरकारकडे ८६ हजार कोटी रुपयांची बिले थकली म्हणून राज्यभरातील कंत्राटदारांनी मंगळवारपासून दोन दिवस मुंबईत आझाद मैदानावर आंदोलनाचा इशारा दिला आहे. सोमवारी दिवसभरात दबाव टाकून कंत्राटदारांना आंदोलन मागे घेण्यास भाग पाडण्यात येईल अशी एक शक्यता आहेच. पण त्यामुळे त्यांची देणी लगेच दिली जाणार नाहीत व मूळ प्रश्न बाकीच राहील. कंत्राटदार संघटना गेल्या अनेक दिवसांपासून राज्यभरात परिषदा घेत आहेत. स्थानिक पातळीवर त्यांनी आंदोलने करूनही झाली आहेत. तरीही सरकार दाद देत नाही. कारण, सरकारकडे यांना द्यायला पैसेच नाहीत. महाराष्ट्राची अब्रू घालवणारा हा सर्व प्रकार आहे. कंत्राटदार ही एक बदनाम जमात आहे. बहुतेक जण सत्ताधारी राजकारण्यांच्या जवळचे असतात असे मानले जाते. शिवाय सर्व कंत्राटांमध्ये भ्रष्टाचार होतोच असे गृहित धरले जाते. प्रत्येक कामात ठराविक टक्केवारीने मंत्री, अधिकारी इत्यादींना पैसे द्यावे लागतात असे सर्रास बोलले जाते. यात या कंत्राटदारांचे हात अडकलेले असतात. त्यामुळे शेतकरी, कामगार किंवा बँक कर्मचारी यांच्यासारखे ते उघडपणे आपल्या मागण्या कधी मांडत नाहीत. संघटना वगैरे करून आंदोलन करणे ही तर फार दूरची गोष्ट झाली. पण भाजपच्या राजवटीत आता तेही घडते आहे. तोंड दाबून बुक्क्यांचा मार इतका असह्य झाला आहे की कंत्राटदारदेखील रस्त्यावर उतरू लागले आहेत. यापूर्वी या मंडळींनी अनेकदा पत्रव्यवहार करून झाला. मंत्र्यांसोबत बैठका झाल्या. प्रत्येक वेळी त्यांना आश्वासने दिली जातात. पण ती पाळण्यासाठी नसतात. एरवी देवेंद्र फडणवीस कसे कारभार-चतुर आहेत म्हणून तारीफ चाललेली असते. पण वास्तवात ही नामुष्की त्यांच्याच कारभारामुळे ओढवलेली आहे.

## लाखो कंत्राटदारांचा प्रश्न

राज्यभरातील कंत्राटदारांची संख्या दोन लाख आहे. यातले थेट सरकारकडून कंत्राटे घेणारे थोडे असावेत. बाकीचे या कंत्राटदारांकडून उक्त्याने कामे घेऊन करून देणारे उपकंत्राटदार असावेत. त्यांच्या देयकांवर नजर टाकली तर पाणीपुरवठा विभागाची सर्वाधिक ४० हजार कोटींची बिले थकली आहेत. यामध्ये अर्थात हर घर नल जल योजनेतील कामांचा अधिक समावेश असावा. त्याखालोखाल जलसंपदा विभागाची सात हजार कोटी आणि सार्वजनिक बांधकाम विभागाची साडेसतरा हजार कोटींची बिले बाकी आहेत. आदिवासी विकास विभागातील सुमारे दहा हजार कोटी रुपये येणे आहेत. ही देयके किती महिन्यांपासून थकली आहेत याचा तपशील बातम्यांमध्ये नाही. पण ती सहा महिने ते वर्षभरासाठी थकलेली असावीत. लहान कंत्राटदार हे स्वतःचे पैसे टाकून कामे करतात. त्यात अनेकदा ते स्वतः कष्टाची कामे करतात. यातले पैसे थकले तर ते पैसाशून्य होतात. पुढच्या कामांसाठी भांडवल सोडा, रोजच्या जगण्यासाठीही पैसे उरत नाहीत. यातले बरेच जण सरकारी कंत्राटांसाठी कर्ज काढून पैसे उभे करतात. त्यांचे व्याज तर द्यावेत लागते. यामुळे मग त्यांची कर्जबाजारी शेतकऱ्यांसारखी स्थिती होते. मध्यंतरी सांगलीच्या तरुण कंत्राटदाराने यापायी आत्महत्या केल्याचे प्रकरण गाजले होते. तेव्हा सरकारने त्यावर थातूरमातूर धावपळ केल्यासारखे दाखवले. पण ती बनावट होती हे आता दिसते आहे. एकेकाळी जे महाराष्ट्र राज्य उत्तम आर्थिक घडीसाठी ओळखले जात होते त्याचे दिवाळे वाजले आहे. लाडकी बहीणसारख्या योजनांनी या राज्याची तिजोरी रिकामी केली आहे. इतकी की शेवटी या योजनेतून ९२ लाख महिलांची नावे काढून टाकण्यात आली. यापैकी साडेचार लाख ६५ वर्षांच्या वरच्या होत्या. पण बाकीच्या बहुतांश आर्थिकदृष्ट्या सुस्थित असूनही या योजनेचा फायदा घेत होत्या. बारा लाख तर प्राप्तिकरही भरत होत्या. याचाच अर्थ या योजनेत प्रचंड भ्रष्टाचार झाला. नव्हे, फडणवीस, शिंदे आणि मंडळींनी जाणूनबुजून तो होऊ दिला. त्यातून त्यांना विधानसभेला मते मिळाली. पण तिजोरी खाली झाल्याने त्यांचा नाईलाज झाला.

## मोडकळीला आलेली व्यवस्था

या योजनेसाठी बिनदिक्कतपणे इतर विभागांचा पैसा वळवण्यात आला. समाजकल्याण, आदिवासी या दुबळ्या खात्यांचा बळी देण्यात आला. मध्यंतरी नरहरी झिरवळ यांच्या नेतृत्वाखाली सर्व आदिवासी आमदारांनी याबाबत आवाजही उठवला होता. पण हे प्रकार थांबलेले नाहीत. याचाच परिणाम म्हणजे आज या विभागातून केलेल्या कामांचे दहा हजार कोटी रुपये कंत्राटदारांना देणे बाकी आहे. आधीच आपले सर्व आदिवासी विभाग राज्याच्या इतर भागांहून कमालीचे मागास आहेत. साधे रस्ते, एसटी, पाण्याचे नळ पोचायलाही तिथे अनेक दशके लागतात. तिथल्या कंत्राटदारांचे पैसे अडवून ठेवणे म्हणजे तिथला पुढचा विकास रोखणे होय. सरकार सध्या हे पाप करीत आहे. साप चावून आदिवासी आश्रमशाळेतील तीन मुली मरण पावल्याची घटना नुकतीच घडली. ही शाळा अनुदानित असली तरी इतर सरकारी शाळांमध्येही तीच स्थिती आहे. पाटबंधारे, रस्ते अशा इतर विभागांमध्येही हेच घडते आहे. त्यामुळे तेथील अनेक कामे रखडलेली आहेत. त्याचा फटका लोकांना बसतो आहे. ओढ्यावर पूल नसल्याने गर्भवती महिलेला झोळीत घालून नेले वगैरे बातम्या आजही येत असतात. स्वातंत्र्यदिनाच्या दिवशी कॉकरोच जनता पार्टीच्या वतीने सर्वत्र शाळांचे ऑडिट सुरू करण्यात आले. अभिजीत दीपके यांनी आपल्या हिंगोलीतल्या मूळ गावच्या शाळेची तपासणी केली तेव्हा तिथे मुलींसाठी पाणी, टॉयलेट यांची धड सोय नसल्याचे दिसले. खिडक्या वगैरे तुटलेल्या होत्या. आज राज्यात सुमारे ६४ हजार सरकारी शाळा आहेत. त्यातील १७८ शाळांना स्वतःची इमारत नाही. ४०१ शाळांमध्ये पिण्याच्या पाण्याची सोय नाही. ८ हजार शाळांमध्ये स्वच्छतागृह नाही. साडेचार हजार शाळांमध्ये विजेची जोडणी नाही. तरीही सरकारच्या बाता मात्र शाळा डिजिटल करण्याच्या असतात. शिक्षणावर मुळात खर्च कमी केला जातो. अर्थसंकल्पातील तरतूद तुटपुंजी असते. त्यात जेमतेम गुरुजी मंडळींचे पगार भागवले जातात. पण चांगल्या इमारती बांधायला किंवा सुविधा करायला सरकारकडे पैसे नसतात किंवा असलेले पैसे निवडणुकीच्या हिशेबाने भलत्याच गोष्टींवर खर्च होत असतात. त्यातूनच ही कंत्राटदारांची अवाढव्य थकबाकी तयार होते. सरकारी आरोग्यसेवेची तर याहूनही वाईट अवस्था आहे. अलिबागच्या सरकारी रुग्णालयाबाबत दैनिक कृषीवलने असंख्य वेळा बातम्या दिल्या आहेत. त्याहून खालच्या प्राथमिक आरोग्य केंद्रांची हालत तर अधिक गंभीर आहे. मुंबईत केईएमसारख्या नावाजलेल्या रुग्णालयात आज साधे एक्सरे किंवा एमआरआय यासारखी मशीन तुटक्या अवस्थेत आहेत. बहुसंख्य तपासण्या बाहेरून करून आणण्यास सांगितले जाते. केईएम हे मुंबई पालिकेचे रुग्णालय आहे. पण राज्य सरकारच्या अखत्यारीतील जेजे रुग्णालयाची स्थिती त्याहून वाईट आहे. ग्रामीण भागातील अवस्था तर अधिकच बिकट आहे. अनेक बाजूंनी मोडकळीला आलेले राज्य असे महाराष्ट्राचे चित्र आहे. कंत्राटदारांचे आंदोलन हे त्याचेच उदाहरण आहे.

---

**विचार**

# एआयचे कार्बन फूटप्रिंट...

*कृत्रिम बुद्धिमत्तेचा पर्यावरणावर होणारा परिणाम हा कमी चर्चिला जाणारा पैलू आहे. प्रचंड प्रमाणात वीज आणि पाण्याची आवश्यकता असल्यामुळे ती स्वतःचे कार्बन फूटप्रिंट कमी करू शकते का, असा प्रश्न उभा राहतो. म्हणूनच कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास, प्रशिक्षण आणि वापर कमी ऊर्जा वापरली जाईल, नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय टळेल आणि पर्यावरणावर होणारा परिणाम कमीत कमी राहील अशा प्रकारे करणे आवश्यक आहे.*

**डॉ. दीपक शिकारपूर**

पर्यावरणाचे रक्षण हा आजच्या काळातील एक महत्त्वाचा विषय आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे आणि औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणाचे नुकसान होत आहे, आणि याचे दुष्परिणाम संपूर्ण जगाला भोगावे लागत आहेत. शेती, पर्यावरण व व्यावसायिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांवर मात करण्याचे अभिनव मार्ग आपल्याला शोधावे लागणार आहेत. तंत्रज्ञान आणि पर्यावरणाची सांगड घालून पारंपारिक ऊर्जास्रोतांचा कमीत कमी वापर कसा करता येईल याकडे विशेष लक्ष द्यावे लागेल, कारण या ऊर्जास्रोतांचे साठे कमी होत आहेत. पर्यावरण संरक्षणासाठी मुळातच कार्बन उत्सर्जन कमी करणे आणि हरित गृह वायू कमी करणे हाच एक उपाय आहे. यासाठी जंगले वाढवणे, जल वायू प्रदूषण कमी करणे हे उपाय आहेतच. या दृष्टीने देशपातळीवर किंवा आंतरराष्ट्रीय पातळीवर बरेच प्रयत्न केले जात आहेत. पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी विज्ञानाचा योग्य वापर करणे आवश्यक आहे. विज्ञानाच्या सहाय्याने आपण पर्यावरणीय समस्या ओळखून निराकरण करू शकतो. तंत्रज्ञानाचा योग्य वापर, शाश्वत साधनांचा विकास आणि पर्यावरणीय संवेदनशीलता यामुळेच आपल्याला पृथ्वीचे संरक्षण करण्यासाठी योग्य मार्गदर्शन मिळेल. हे आपल्यासाठीच नव्हे, तर भविष्यातील पिढ्यांसाठीही अत्यावश्यक आहे.

आज कृत्रिम बुद्धिमत्तेची चर्चा जगभर सुरू आहे. शिक्षण, आरोग्य, शेती, उद्योग, बँकिंग, वाहतूक, शासन, संशोधन अशा जवळजवळ प्रत्येक क्षेत्रात तिचा वापर झपाट्याने वाढत आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे कामाचा वेग वाढतो, निर्णय अधिक अचूक होतात आणि उत्पादनक्षमताही सुधारते. मात्र या तंत्रज्ञानाचा कमी चर्चिला जाणारा एक पैलू म्हणजे पर्यावरणावर होणारा परिणाम. कृत्रिम बुद्धिमत्ता चालवण्यासाठी प्रचंड प्रमाणात संगणकीय क्षमता, वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो- कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतःचे कार्बन फूटप्रिंट कमी करू शकते का? या प्रश्नाचे उत्तर म्हणजे शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता. याचा अर्थ असा की कृत्रिम बुद्धिमत्तेचा विकास, प्रशिक्षण आणि वापर अशा पद्धतीने करणे की किमान ऊर्जा वापरली जाईल, नैसर्गिक संसाधनांचा अपव्यय टळेल आणि पर्यावरणावर होणारा परिणाम कमीत कमी राहील. कार्बन फूटप्रिंट म्हणजे काय? एखादी व्यक्ती, संस्था, उद्योग किंवा तंत्रज्ञान आपल्या कामकाजातून वातावरणात जितके हरितगृह वायू निर्माण करते, त्याला कार्बन फूटप्रिंट म्हणतात. संगणक, माहिती केंद्रे, भ्रमणध्वनी, जालसेवा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी चालणाऱ्या मोठ्या संगणकीय प्रक्रियांना मोठ्या प्रमाणावर वीज लागते. ही वीज प्रदूषण करणाऱ्या इंधनांपासून तयार होत असेल, तर कार्बन फूटप्रिंट वाढते.

कृत्रिम बुद्धिमत्तेची निर्मिती आणि प्रशिक्षण ही अत्यंत ऊर्जा-प्रधान प्रक्रिया आहे. लाखो कोटी माहितींचे विश्लेषण, सतत चालणारी गणिते आणि दिवस-रात्र कार्यरत असलेले संगणक यासाठी प्रचंड ऊर्जा खर्च होते. त्याशिवाय ही यंत्रणा थंड ठेवण्यासाठीही मोठ्या प्रमाणावर वीज आणि पाण्याची आवश्यकता असते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा वाढता वापर पर्यावरणासमोर एक नवे आव्हान निर्माण करत आहे. परंतु, याच तंत्रज्ञानात या समस्येचे उत्तरही दडले आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतःच ऊर्जाबचतीचे मार्ग शोधू शकते. कोणती प्रक्रिया आवश्यक आहे, कोणती टाळता येईल, कोणती माहिती पुन्हा वापरता येईल आणि कोणत्या पद्धतीने कमी ऊर्जेमध्ये अधिक काम करता येईल, याचा अभ्यास ती करू शकते. त्यामुळे कमी ऊर्जा वापरून अधिक परिणामकारक काम करणे शक्य होते आणि कार्बन फूटप्रिंट कमी होते. आज जगातील अनेक माहिती केंद्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने थंडावा देणाऱ्या यंत्रणांचे स्वयंचलित नियंत्रण केले जाते. त्यामुळे विजेचा वापर लक्षणीयरीत्या कमी झाला आहे. उद्योगांमध्ये यंत्रांची कार्यक्षमता वाढवून ऊर्जा बचत केली जाते. शेतीमध्ये आवश्यक तेवढेच पाणी वापरण्याचा सल्ला दिला जातो. शहरांमध्ये वाहतूक सुरळीत ठेवून इंधनाचा अपव्यय कमी केला जातो. घरांमध्ये वीजवापराचे नियोजन अधिक कार्यक्षम बनवले जाते. म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्ता स्वतः ऊर्जा वापरत असली, तरी ती अनेकपटींनी अधिक ऊर्जा वाचवण्याची क्षमता ठेवते.

भारतासाठी हा विषय अत्यंत महत्त्वाचा आहे. आपला देश वेगाने डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वाटचाल करत आहे. शासन, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक मोठ्या प्रमाणावर कृत्रिम बुद्धिमत्तेचा स्वीकार करत आहेत. त्याच वेळी भारताने पर्यावरण संरक्षण, स्वच्छ ऊर्जा आणि शाश्वत विकासाची महत्त्वाकांक्षी उद्दिष्टे स्वीकारली आहेत. त्यामुळे तांत्रिक प्रगती आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल राखणे अत्यावश्यक आहे. भारताकडे सूर्यऊर्जा, पवनऊर्जा आणि इतर स्वच्छ ऊर्जेचे विपुल स्रोत आहेत. भविष्यात माहिती केंद्रे आणि कृत्रिम बुद्धिमत्तेची संगणकीय यंत्रणा या स्वच्छ ऊर्जेवर चालू लागल्या, तर कार्बन फूटप्रिंट मोठ्या प्रमाणात कमी करता येईल. त्यामुळे ऊर्जा खर्च कमी होईल, प्रदूषण घटेल आणि पर्यावरण संरक्षणालाही मोठी मदत मिळेल. शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्तेसाठी माहिती केंद्रांची रचनाही बदलावी लागेल. कमी वीज वापरणारे संगणक, ऊर्जा बचत करणाऱ्या यंत्रणा, नैसर्गिक थंडावा, पाण्याचा मर्यादित वापर आणि पुनर्वापरयोग्य साधनसामग्री यांचा स्वीकार करणे आवश्यक आहे. तंत्रज्ञान जितके बुद्धिमान असेल तितकेच ते पर्यावरणपूरकही असले पाहिजे. यामध्ये माहिती तंत्रज्ञान वापरणाऱ्या प्रत्येक नागरिकाची महत्त्वाची भूमिका आहे. आपण अनेकदा गरज नसताना कृत्रिम बुद्धिमत्तेकडून एकाच प्रकारची उत्तरे पुन्हा पुन्हा मागतो, अनावश्यक चित्रे तयार करतो, निरुपयोगी माहिती साठवून ठेवतो किंवा मोठ्या प्रमाणात माहितीची देवाणघेवाण करतो. या प्रत्येक कृतीसाठी ऊर्जा खर्च होते. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्तेचा विवेकपूर्ण आणि जबाबदारीने वापर करणे ही काळाची गरज आहे.

संगणक, भ्रमणध्वनी आणि इतर साधने वापरताना ऊर्जाबचतीची काळजी घ्यायला हवी. आवश्यक तेव्हाच कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर करावा, नको असलेली माहिती नियमितपणे हटवावी. जुनी उपकरणे अधिकृत पुनर्वापरासाठी द्यावीत. नवीन उपकरणे खरेदी करताना ऊर्जा बचत करणाऱ्या साधनांना प्राधान्य द्यावे. या छोट्या सवयींमुळे कार्बन फूटप्रिंट कमी करण्यासाठी मोठे योगदान देता येते. माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपन्यांची जबाबदारी आणखी मोठी आहे. कमी ऊर्जा वापरणारी कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करणे, स्वच्छ ऊर्जेचा वापर वाढवणे, पर्यावरणपूरक माहिती केंद्रे उभारणे, पाण्याचा अपव्यय कमी करणे, जुन्या उपकरणांचा पुनर्वापर करणे आणि कर्मचाऱ्यांमध्ये पर्यावरणपूरक कार्यसंस्कृती निर्माण करणे ही त्यांची सामाजिक जबाबदारी आहे. प्रत्येक नव्या प्रकल्पाची कार्बन फूटप्रिंट मोजणे आणि ती कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे हे आता प्रत्येक संस्थेचे धोरण असले पाहिजे. केवळ अधिक वेगवान कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करणे पुरेसे नाही; ती ऊर्जा बचत करणारी, संसाधनांचा कार्यक्षम वापर करणारी आणि पर्यावरणपूरक असली पाहिजे. भविष्यात स्पर्धा केवळ अधिक शक्तिशाली कृत्रिम बुद्धिमत्तेची नसेल, तर अधिक शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता विकसित करणाऱ्यांची असेल. शैक्षणिक संस्थांनी विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या पर्यावरणपूरक आणि जबाबदार वापराचेही शिक्षण दिले पाहिजे. उद्याचे संशोधक, अभियंते आणि उद्योजक यांनी विकासाबरोबरच पर्यावरण संरक्षणाचा विचार केला, तर भारत जगासाठी आदर्श निर्माण करू शकेल.

शासनानेही ऊर्जाबचत करणाऱ्या तंत्रज्ञानाला प्रोत्साहन, पर्यावरणपूरक माहिती केंद्रांसाठी धोरणे, संशोधनासाठी सहाय्य आणि जनजागृती यावर भर दिला पाहिजे. शासन, उद्योग, शैक्षणिक संस्था आणि नागरिक यांनी एकत्रितपणे प्रयत्न केल्यास शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता ही केवळ संकल्पना न राहता वास्तव बनेल. यासाठी सर्व स्तरांवर प्रबोधन होणे गरजेचे आहे, तरच आपण पुढच्या पिढीला अधिक चांगल्या अवस्थेत आपल्या पृथ्वीला सादर करू शकू. अन्यथा, आगामी पिढ्या आपल्याला माफ करणार नाही. आपण बेलाशक चंगळवादात पर्यावरणाचा ऱ्हास केला, असा ठपका नको असेल तर सर्व घटकांनी जागे झाले पाहिजे. आज प्रश्न कृत्रिम बुद्धिमत्ता वापरायची की नाही हा नाही. प्रश्न असा आहे की ती अधिक जबाबदारीने, अधिक कार्यक्षमतेने आणि पर्यावरणपूरक पद्धतीने कशी वापरायची हा. विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष नसून समन्वय असू शकतो, हे शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्ता सिद्ध करते. भविष्यात खऱ्या अर्थाने तोच प्रगत देश ठरेल, जो कमी ऊर्जा वापरून अधिक परिणामकारक तंत्रज्ञान विकसित करेल. भारताकडे ज्ञान, संशोधन, कुशल मनुष्यबळ आणि नवकल्पनांची मोठी ताकद आहे. या सामर्थ्याचा योग्य उपयोग करून भारत शाश्वत कृत्रिम बुद्धिमत्तेच्या क्षेत्रात जगाचे नेतृत्व करू शकतो. तंत्रज्ञानाचा प्रत्येक टप्पा निसर्गाशी मैत्री करणारा असेल, तरच विकासाचा प्रवास खऱ्या अर्थाने शाश्वत ठरेल.

**(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)**

---

**चर्चा आजची**

# आधुनिकतेसोबत संस्कृती जपणे आवश्यक

**अंतरा पारंगे**



आपला भारत देश हा संस्कृती जपणारा देश आहे. आपली संस्कृती हीच आपली ओळख आहे. त्यामुळे आपल्या देशात हजारो वर्षांपासून परंपरा, चालीरीती आणि सांस्कृतिक श्रद्धा पाळल्या जात आहेत. विविध सणांमधून आपण आपली संस्कृती आणि परंपरा जपत असतो. मात्र आधुनिकतेच्या युगात, विज्ञान, तंत्रज्ञान विकास आणि जागतिकीकरणामुळे संस्कृतीत बदल होत आहे आणि ते स्वाभाविकच आहे. डिजिटल युगामुळे जीवनशैली बदलली असली तरी सणांचे महत्त्व कमी झालेले नाही. ऑनलाइन दर्शन, धार्मिक प्रवचने, सामाजिक माध्यमांवरील शुभेच्छा आणि पर्यावरणपूरक उपक्रमांमुळे परंपरा नव्या स्वरूपात पुढे जात आहे. मात्र, आधुनिकतेसोबत संस्कृतीची मुळे जपणे तितकेच आवश्यक आहे.

भारतीय संस्कृतीमध्ये श्रावण महिन्याचे स्थान विशेष आहे. श्रावण हा केवळ धार्मिक विधी आणि व्रत-वैकल्यांचा महिना नाही. निसर्ग, आरोग्य, सामाजिक जीवन आणि मानसिक स्वास्थ्याशी जोडलेला महिना म्हणूनही पाहता येतो. म्हणूनच श्रावणाकडे केवळ देवपूजा, उपवास आणि सणांचा महिना म्हणून न पाहता 'निसर्ग, आरोग्य, संस्कृती आणि सकारात्मक जीवनशैली यांचा संगम घडविणारा महिना' म्हणून पाहिले पाहिजे. परंपरेला आधुनिकतेची साथ मिळाली, तर श्रावणाचा संदेश आजच्या आधुनिक समाजासाठीही तितकाच अर्थपूर्ण आणि उपयुक्त ठरू शकतो.

श्रावण मासात विविध सण येतात. त्यापैकी नागपंचमी, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी, नारळी पौर्णिमा इत्यादी अनेक सण येतात. श्रावणाचा सर्वात मोठा संदेश निसर्गाशी जोडलेला आहे. या काळात वनस्पतींची वाढ मोठ्या प्रमाणात होते. पावसामुळे जैवविविधतेला चालना मिळते. जसे की, नागपंचमीच्या दिवशी मातीच्या नागाची विधिवत पूजा करण्याची परंपरा अनेक कुटुंबांमध्ये आहे. मात्र, पूजेसाठी जिवंत नाग पकडणे किंवा त्याचा वापर करणे टाळणे आवश्यक आहे. नाग हा शेतकऱ्यांचा मित्र मानला जातो. शेतातील उंदीर तसेच अन्य पिकांना नुकसान करणाऱ्या प्राण्यांवर नियंत्रण ठेवण्यात नागाची महत्त्वाची भूमिका असते. त्यामुळे नागपंचमीच्या निमित्ताने सर्पसंवर्धनाचा संदेश देण्याची गरज व्यक्त होत आहे. नागांना पकडून त्यांची पूजा करण्यापेक्षा त्यांच्या नैसर्गिक अधिवासाचे संरक्षण करणे महत्त्वाचे आहे. तर मातीच्या नागांची पूजा करून परंपरा आणि पर्यावरण संवर्धनाचा समतोल साधता येतो. नागपंचमीसारख्या सणांमधून सर्पांविषयी आदर आणि संरक्षणाची भावना समाजात निर्माण झाली. आज साप पर्यावरणातील अन्नसाखळीचा महत्त्वाचा घटक आहे, हे विज्ञान सांगते. त्यामुळे अशा परंपरांचा आधुनिक अर्थ घेताना वन्यजीवांचे संरक्षण, त्यांच्या अधिवासाचे रक्षण आणि जैवविविधतेचे संवर्धन यांना महत्त्व देणे गरजेचे आहे.

नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, मंगळागौर यांसारखे सणही श्रावणाच्या सामाजिक जीवनाचे दर्शन घडवतात. पूर्वीच्या काळात अशा सणांमुळे कुटुंबीय, नातेवाईक आणि समाजातील लोक एकत्र येत असत. मंगळागौरसारख्या कार्यक्रमांमुळे महिलांना एकत्र येण्याची, संवाद साधण्याची आणि मनोरंजनाची संधी मिळत असे. आजच्या काळात वाढता ताण, एकाकीपणा आणि डिजिटल जीवनशैली पाहता सामाजिक संवाद आणि सामूहिक आनंदाचे महत्त्व आणखी वाढले आहे. तर सणांच्या काळात हजारो नवीन रोजगाराच्या संधी निर्माण होतात. पूजेसाठी लागणाऱ्या साहित्याची बाजारात मोठ्या प्रमाणावर खरेदी सुरू असते. फुले, केळीची पाने, बेल, दुर्वा आणि फळविक्रीतून स्थानिकांना रोजगार उपलब्ध होत आहे. यामध्ये सजावट, मिठाई निर्मिती, इव्हेंट मॅनेजमेंट, कपड्यांची दुकाने यांसारख्या क्षेत्रांतही स्थानिक पातळीवर अल्पमुदतीचे काम व चांगले उत्पन्न मिळते. मात्र, यातही काही वेळा कृत्रिम किंवा प्लास्टिक सजावटीच्या साहित्य वापरामुळे प्रदूषणात वाढ होऊ शकते. त्यामुळे सण साजरे करताना शक्यतो नैसर्गिक गोष्टींचा वापर करणे तितकेच गरजेचे आहे.

वाढत्या शहरीकरणामुळे आणि औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणात आमुलाग्र बदल झाला असून निसर्ग प्रदुषणाच्या विळख्यात सापडलेला आहे. यापासून सावरण्यासाठी वृक्षलागवड करणे अत्यंत आवश्यक आहे. भारतीय संस्कृतीत प्रत्येक प्राणी, वनस्पती, फुल एवढंच काय तर संपूर्ण सृष्टीला देवाच्या रूपात पाहिले जाते. त्यामुळे सणांच्या निमित्ताने संपूर्ण प्राणीमात्रांना वाचविण्याचासाठी निसर्ग प्रफुल्लित ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. याकरीता श्रावण महिन्याचे औचित्य साधून मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करणे गरजेचे आहे. परंतु, लागवड केलेल्या झाडांचे संवर्धन करणेही तितकेच गरजेचे आहे.

आजच्या धावपळीच्या आणि तणावपूर्ण जीवनात श्रावणातील सणांचे महत्त्व अधिक वाढले आहे. मंदिरातील शांत वातावरण, प्रार्थना, मंत्रजप, ध्यान आणि सत्संग यांमुळे मानसिक तणाव कमी होण्यास मदत होते. तर रक्षाबंधन यांसारख्या सणांमध्ये आपण एकमेकांसोबत आनंद वाटतो आणि नाते मजबूत करतो. त्यामुळे आजच्या वेगाने बदलणाऱ्या समाजात जिथे आधुनिकता वेगाने पसरत आहे, तिथे आपण आपली संस्कृती आणि परंपरा जपणे आवश्यक बनले आहे.

---

**लोकसंसद**

## पादचारी प्रथम मोहीम स्वागतार्ह

मुंबई महापालिकेने मुंबईकरांना सुरक्षित आणि अडथळामुक्त पदपथ उपलब्ध करून देण्यासाठी 'पादचारी प्रथम' मोहीम सुरू केली आहे. या मोहिमेअंतर्गत पदपथावरील अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, फेरीवाल्यांचे अडथळे, फलक-बॅनर तसेच इतर अडथळे हटविण्याची कारवाई सुरू आहे. ही बाब निश्चितच स्वागतार्ह आहे. पदपथ हे पादचाऱ्यांसाठीच असतात. मात्र, अनेक ठिकाणी दुकानदार आपला बराचसा माल, फलक, फर्निचर आणि इतर साहित्य पदपथावर मांडून ठेवतात. त्यामुळे पादचाऱ्यांना पदपथावरून चालणे जिकीरीचे होते. नाईलाजाने त्यांना मुख्य रस्त्यावरून चालावे लागते आणि तेथे वेगाने धावणाऱ्या वाहनांचा सामना करावा लागतो. यातून अपघाताचा धोका वाढतो. त्यामुळे 'पादचारी प्रथम' ही मोहीम अत्यंत आवश्यक असून ती केवळ काही दिवसांपुरती मर्यादित न राहता सातत्याने सुरू राहणे गरजेचे आहे. अतिक्रमण हटवल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अतिक्रमण होणार नाही, याचीही महापालिकेने दक्षता घ्यावी. पदपथ हा दुकानदारांचा पसारा मांडण्यासाठी नव्हे, तर पादचाऱ्यांच्या सुरक्षित वाटचालीसाठी आहे. पादचाऱ्यांना त्यांचा हक्काचा आणि सुरक्षित मार्ग मिळवून देण्यासाठी महापालिकेच्या या मोहिमेला सातत्य आणि नागरिकांचे सहकार्य दोन्ही आवश्यक आहे.

**दीपक काशिराम गुंडये, वरळी.**

---

**दिनविशेष**

# स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते नेताजी सुभाषचंद्र बोस



स्वातंत्र्य चळवळीचे महान नेते सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ साली कटक येथील प्रसिद्ध वकील जानकी नाथ आणि प्रभावती देवी यांच्या पोटी झाला. इंग्रजांच्या दडपशाहीच्या निषेधार्थ त्यांच्या वडिलांनी रायबहादूर ही पदवी परत केली. त्यामुळे सुभाषच्या मनात इंग्रजांबद्दल कटुता रुजली.

सुभाष यांनी इंग्रजांना भारतातून हुसकावून लावण्याची आणि भारताला स्वतंत्र करण्याची प्रतिज्ञा घेतली आणि राष्ट्रवादाच्या मार्गावर चालू लागले. आयसीएस परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर सुभाष यांनी आयसीएसचा राजीनामा दिला. या गोष्टीवर त्यांच्या वडिलांनी त्यांचे मनोबल वाढवले आणि तुम्ही देशसेवेचे व्रत घेतले आहे, तेव्हा या मार्गापासून कधीही विचलित होऊ नका, असे सांगितले.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी दुसरे महायुद्ध सुरू असताना इंग्रजांशी लढण्यासाठी जपानच्या मदतीने आझाद हिंद फौज स्थापन केली होती. नेताजी ही त्यांना लोकांनी दिलेली उपाधी. त्यांनी दिलेला जय हिंदचा नारा हा भारताचा राष्ट्रीय नारा बनला आहे. त्यांनी तुम मुझे खून दो मैं तुम्हे आजादी दूंगा, असे आवाहन केले होते.सुभाषबाबूंनी दास्यमुक्तीसाठी आणि नंतरच्या प्रगतीसाठी अनेक योजना आखल्या. त्या कार्यवाहीत आणण्यासाठी अविश्रांत परिश्रम घेतले. प्रकृतीची पुरेशी साथ नसतानाही त्यांनी उपोषण-निदर्शनांपासून सशस्त्र युद्धापर्यंतचे सर्व मार्ग आचरणात आणले. त्यासाठी त्यांनी म. गांधीपासून स्वातंत्र्यवीर वि. दा. सावरकरांपर्यंतच्या सर्व नेत्यांचे प्रसंगोपात्त सहकार्य स्वीकारले. त्यांचा स्वभाव दृढनिश्चयी व प्रसंगी कठोरही होत होता; तथापि त्यांचे वागणे मात्र सौजन्यशील व सौहार्दाचे असे. मूळात त्यांचा कल आध्यात्मिक साधनेकडे होता. दूरदृष्टी, जबरदस्त, आत्मविश्वास, धडाडी आणि निर्भयता यांमुळे कोणत्याही प्रसंगी ते डगमगले नाहीत. आझाद हिंद सरकारच्या स्थापनेनंतर त्यांनी स्वीकारलेले राष्ट्रगीत हेच स्वतंत्र भारताचे राष्ट्रगीत बनले. स्वातंत्र्य चळवळीला नवा मार्ग देत सुभाष यांनी तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न पूर्ण निष्ठेने सुरू केला. त्याची सुरुवात ४ जुलै १९४३ रोजी सिंगापूर येथे झालेल्या भारतीय स्वातंत्र्य परिषदेने झाली. ५ जुलै १९४३ रोजी आझाद हिंद फौजची औपचारिक स्थापना झाली. २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी आशियातील विविध देशांमध्ये राहणाऱ्या भारतीयांची परिषद भरवून आणि तात्पुरते स्वतंत्र भारत सरकार स्थापन करून स्वातंत्र्य मिळवण्याचा आपला संकल्प पूर्ण केला. १२ सप्टेंबर १९४४ रोजी रंगूनच्या ज्युबली हॉलमध्ये हुतात्मा यतिंद्र दास यांच्या स्मृतीदिनानिमित्त नेताजी यांनी अतिशय भावविभोर भाषण केले आणि ते म्हणाले - आता आपले स्वातंत्र्य निश्चित आहे, परंतु स्वातंत्र्य बलिदानाची मागणी करते. तुम्ही मला रक्त द्या, मी तुम्हाला स्वातंत्र्य देईन. भारताच्या इतिहासातच नव्हे तर जगाच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी कोरले गेलेले हे वाक्य देशातील तरूणाईत प्राण फुंकणारे होते. १६ ऑगस्ट १९४५ रोजी नेताजींचे विमान टोकियोला निघताना तायहोकू विमानतळावर कोसळले आणि १८ ऑगस्ट १९४५ रोजी स्वतंत्र भारताच्या अमरत्वाची घोषणा करणारे, भारतमातेचे लाडके नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निधन झाले. देशभक्तीचा दिव्य प्रकाश प्रज्वलित करून ते अमर झाले.

# पनवेल महानगरपालिका

ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

दूरध्वनी कार्यालय:-०२२-२७४५८०४०,४१,४२ वेबसाईट–www.panvelcorporation.com
ई-मेल :- panvelcorporation@gmail.com

कार्यालय जा.क्र. पमपा/बांधकाम/ ७०२६ /प्र.क्र. 09 / २५३९/२०२६ दि. १७/०८ /२०२६

## जाहीर निविदा

आयुक्त, पनवेल महानगरपालिका खाली नमूद कामांकरिता योग्य त्या वर्गात नोंदणीकृत ठेकेदारांकडून जाहीर निविदा बी –1 नमुन्यात मागवीत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाची अंदाजित किंमत रु. (Without GST) | अनामत रक्कम रु. | निविदा प्रत किंमत + 18% विक्री कर = एकूण निविदा किंमत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|
| 1. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.03 मधील तळोजा फेज-1 (पेठाली) येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/47/2026-27) | 2,96,365/- | 3000/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 2. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.02 मधील नावडे येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/48/2026-27) | 3,65,930/- | 3,700/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 3. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.03 मधील मुर्बी तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/49/2026-27) | 3,13,523/- | 3,200/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 4. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.03 मधील खुटूक बांधण गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/50/2026-27) | 3,21,203/- | 3,200/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 5. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.03 मधील ओवे पेठ येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) (PMC/CE/51/2026-27) | 3,11,116/- | 3100/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 6. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.03 मधील पापडीचापाडा येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/52/2026-27) | 3,29,029/- | 3,300/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 7. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.03 मधील रांजणपाडा येथील गणेश घाट जवळ विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/53/2026-27) | 3,13,523/- | 3,200/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 8. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.04, खारघर सेक्टर-14 येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) (PMC/CE/54/2026-27) | 4,90,452/- | 4,900/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 9. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.05 मधील बेलपाडा येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/55/2026-27) | 4,33,612/- | 4,400/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 10. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.06 मधील खारघर-कोपरा सेक्टर-15 येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) (PMC/CE/56/2026-27) | 5,31,157/- | 5,300/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 11. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.06 मधील खारघर, सेक्टर-10 (कोपरा खाडी जवळ) येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/57/2026-27) | 3,39,192/- | 3,400/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 12. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.07 मधील सेक्टर- 12, कळंबोली गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/58/2026-27) | 3,50,438/- | 3,500/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 13. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.09 खिडूकपाडा गावातील गणेश घाटाची दुरुस्ती आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/59/2026-27) | 3,68,478/- | 3,700/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 14. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्र. क्र.12 मधील कामोठे गाव (शंकर मंदिर) येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इत्यादी) (PMC/CE/60/2026-27) | 5,43,793/- | 5,400/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 15. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.13 मधील जुई गाव येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मनुष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, हॅलोजन लावणे इ.) (PMC/CE/61/2026-27) | 3,34,039/- | 3,400/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 16. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.15 मधील सेक्टर- 2, खांदा कॉलनी शंकर मंदिर गणेश विसर्जन घाट येथे विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/62/2026-27) | 3,17,383/- | 3,200/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 17. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.16 मधील आदई तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/63/2026-27) | 3,92,930/- | 4,000/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 18. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.17 मधील नविन पनवेल, सेक्टर-14, धारण तलाव गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे.(साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/64/2026-27) | 2,64,022/- | 2,700/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 19. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.20 मधील पोदी, रेल्वे भूयारी मार्ग जवळ गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/65/2026-27) | 1,97,032/- | 2,000/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 20. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.20 मधील काळुंद्रे गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे व विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/66/2026-27) | 2,43,305/- | 2,500/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 21. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.20 मधील भिंगारी - नांदगाव रस्ता येथील गणेश घाटाची देखभाल दुरुस्ती करणे आणि विविध सुविधा पुरविणे. (साफसफाई आणि विसर्जनसाठी मन्युष्यबळ पुरविणे, मंडप बांधणे, टेबल खुच्या पुरविणे, तराफा पुरविणे, इत्यादी) (PMC/CE/67/2026-27) | 1,83,450/- | 1,900/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 22. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.07 मधील सेक्टर-12 कळंबोली गणेश विसर्जन घाट येथे गणेश मुर्ती विसर्जन करीता विंच मशीन बसविणे व विविध सुविधा पुरविणे. (PMC/CE/68/2026-27) | 3,82,090/- | 3,800/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 23. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.19 येथील कोळीवाडा, पनवेल येथे गणेश विसर्जन घाटाचे दुरुस्ती करणे व रंगरंगोटी करणे. (PMC/CE/69/2026-27) | 2,43,665/- | 2,500/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 24. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.20 येथील तक्का गणेश घाट येथे विसर्जन करीता मनुष्यबळ पुरविणे. (PMC/CE/70/2026-27) | 1,88,230/- | 1,900/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 25. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.19, पनवेल - कोळीवाडा येथे गणेश विसर्जन घाट येथे मनुष्यबळ व होडी पुरविणे. (PMC/CE/71/2026-27) | 2,46,908/- | 2,500/- | 200+ 36= 236 | 45 दिवस |
| 26. | गणेशोत्सव 2026 करीता पनवेल महानगरपालिका हद्दीतील किरवली, धानसर □ आगरीपाडा, धानसर-मराठापाडा, तुर्भे, सिध्दी करवले, धरणा कॅम्प (नवीन वसाहत), खुटारी पिसार्वे, पेंधर, पेंधर-श्रीपान पाटील यांच्या घराजवळील तलाव, तोंडरे-वरचा पाडा, टेंभोडे, वळवली, कळंबोली गाव, म्हसोबा तलाव से-12, कळंबोली (रोडपाली) इत्यादी ठिकाणी गणेश मुर्ती विसर्जना करीता तराफा व तराफ्यासाठी मनुष्यबळ पुरविणे. (PMC/CE/72/2026-27) | 4,33,297/- | 4,400/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |
| 27. | पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.19, पनवेल-कोळीवाडा येथे गणेश विसर्जन सन 2026 करीता तराफा पुरविणे. (PMC/CE/73/2026-27) | 4,64,841/- | 4,700/- | 500+ 90 = 590 | 45 दिवस |

याकामी कोरी निविदा दिनांक 18/08/2026 पासुन दि. 31/08/2026 पर्यंत सांय. 5.00 वाजेपर्यंत (कार्यालयीन वेळेत) बांधकाम विभागात उपलब्ध होतील.

१) अनामत रक्कमेचा डिमांड ड्राफट निविदेसोबत लखोटा क्र. 1 मध्ये सादर करण्याचा आहे.
२) सीलबंद निविदा दि.01/09/2026 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत पनवेल महानगरपालिकेच्या बांधकाम विभागात स्विकारण्यात येतील.
३) प्राप्त झालेल्या निविदा शक्यतो दि.01/09/2026 रोजी दुपारी 3.30 वाजता शहर अभियंता यांच्या दालनात उपस्थित ठेकेदार यांच्या समक्ष उघडण्यात येतील.
४) कोरी निविदा मिळणेकामी अर्ज सादर करताना ठेकेदाराने सोबत ठेकेदार नोंदणी प्रमाणपत्र अथवा गणेश विसर्जनाकरीता उपाययोजना करणेच्या कामाचा अनुभवाचा दाखला, जीएसटी, पॅन ही कागदपत्रे अर्ज पत्रासोबत जोडणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफ्यामध्ये वरील तांत्रिक कागदपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.

प्राप्त निविदेतील 1 अथवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता मंजुर अथवा ना मंजुर करण्याचा हक्क पनवेल महानगरपालिकेने राखुन ठेवला आहे.

अतिरिक्त आयुक्त-I
पनवेल महानगरपलिका

जा.क्र पमपा/बांधकाम/7026/प्र.क्र. 01 / 2539 /2026
दि. 17/08/2026

# पारंपरिक मच्छिमार चिंतेत

## कृषी दर्जानुसार नुकसानभरपाईची मागणी; डिझेलच्या वाढत्या दराचा फटका

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

पावसाळ्यातील मासेमारी बंदी, समुद्रातील खराब हवामान, अवैध पर्ससीन मासेमारी तसेच डिझेलच्या वाढत्या दरामुळे मुरूड तालुक्यातील पारंपरिक मच्छिमार कोळी बांधव आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा दिल्याने त्याच धर्तीवर मासेमारी बंदीच्या काळात तसेच नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी मच्छिमारांना आर्थिक मदत व नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे.



आता अडीच महिन्यांच्या बंदीनंतर सागराला श्रीफळ अर्पण करून मासेमारीचा हंगाम सुरू होणार आहे. मात्र हंगाम सुरू झाल्यानंतर बोटी समुद्रात उतरविण्यासाठी डिझेल, पाणी आणि जीवनावश्यक साहित्य खरेदी करण्यासाठी अनेक मच्छिमारांना कर्ज काढावे लागते. समुद्रात गेल्यानंतर खराब हवामान व सागरी वादळामुळे बोटी पुन्हा किनाऱ्यावर आणाव्या लागतात. त्यामुळे मासेमारीचे दिवस वाया जात असून मोठे आर्थिक नुकसान होते. त्यानंतर समुद्रात गेल्यावर मत्स्य विभाग, कस्टम, नौदल आणि तटरक्षक दलाच्या सीमांकनामुळेही मच्छिमारांना विविध अडचणींचा सामना करावा लागत आहे. सुरुवातीचे चार महिने मत्स्य हंगामासाठी महत्त्वाचे असताना याच काळात मोठ्या प्रमाणावर मत्स्यसंपदा नष्ट होत असल्याने पारंपरिक मच्छिमारांच्या हाती कमी मासे लागतात. या मच्छिमार कोळी बांधवांचा शासनाने विचार करुन कृषी दर्जानुसार नुकसान भरपाईची मिळावी अशी मागणी जोर धरत आहे.

महाराष्ट्र मच्छिमार संघ मुंबईचे संचालक, रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे व्हाईस चेअरमन तथा मुरूड सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले यांनी सांगितले की, रायगड जिल्ह्यात सुमारे २२२७ यांत्रिक बोटी असून मुरुड तालुक्यातील सुमारे ९० टक्के बोटी दालदी पद्धतीने मासेमारी करतात. एका बोटीवर १० ते १२ खलाशी काम करतात.

एका मासेमारीच्या ट्रिपसाठी ५० ते ६० हजार रुपयांचा खर्च येतो. मासे चांगले मिळाल्यास नफा होतो; मात्र मासे न मिळाल्यास संपूर्ण ट्रिप तोट्यात जाते. मोठ्या जहाजांमुळे जाळी तुटणे किंवा वाहून जाण्याच्या घटनांमुळेही मच्छिमारांचे मोठे नुकसान होते. तसेच, मच्छिमार संस्थांना मिळणाऱ्या डिझेलचा दर बल्क प्रॉडक्टच्या वर्गवारीमुळे सुमारे १३६ रुपये प्रतिलिटर झाला आहे, तर सार्वजनिक पेट्रोल पंपावर डिझेलचा दर तुलनेने कमी आहे. त्यामुळे मच्छिमार सोसायट्यांकडून डिझेल खरेदी कमी होत असून संस्था आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता आहे. मच्छीमार संस्थांना बल्क प्रॉडक्टच्या वर्गवारीतून वगळावे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

मत्स्य व्यवसायाला कृषीचा दर्जा दिल्याचा प्रत्यक्ष लाभ पारंपरिक मच्छीमारांना मिळावा. मासेमारी बंदीच्या काळात आर्थिक मदत, नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीची भरपाई, डिझेलवरील सवलत आणि अवैध पर्ससीन मासेमारीवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी महाराष्ट्र मच्छिमार संघ मुंबईचे संचालक, रायगड जिल्हा मच्छिमार संघाचे व्हाईस चेअरमन तथा मुरूड सागर कन्या मच्छिमार सोसायटीचे चेअरमन मनोहर बैले यांनी केली आहे.

## पनवेलमध्ये तीन ग्रामपंचायतींचा पुरस्काराने गौरव

**पनवेल :** आदिशक्ती अभियान अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी घोषित करण्यात आलेल्या आदिशक्ती पुरस्कारांमध्ये पनवेल तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना पुरस्कार मिळाला आहे. खेरणे खुर्द ग्रामपंचायतने प्रथम क्रमांक, बारवई ग्रामपंचायतीने द्वितीय तर ओवळे ग्रामपंचायतने तृतीय क्रमांक मिळवला आहे. राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय आणि तालुकास्तरीय आदिशक्ती पुरस्कार जाहीर करण्यात आलेले आहेत. पनवेल तालुक्यात अभियान प्रभावीपणे राबवण्यासाठी एकात्मिक बाल विकास अधिकारी प्रवीण पाटील यांनी विविध विभागांमध्ये समन्वय साधून ग्रामपंचायतींना मार्गदर्शन करणे, अभियानाच्या निकषानुसार कामांची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांनी पाठपुरावा केला. पनवेल तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींना हा पुरस्कार मिळाला आहे.

# स्वयंभू जीवनेश्वर मंदिरामध्ये भाविकांची गर्दी

## धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन; भक्तांकडून शिवलीलामृताचे पारायण

**। श्रीवर्धन । प्रतिनिधी ।**

श्रीवर्धन शहराला अत्यंत प्राचीन महत्त्व आहे. श्रीवर्धन येथील स्वयंभु जीवनेश्वर मंदिर हे सुद्धा खूप प्राचीन मंदिर आहे. मंदिर परिसरामध्ये अत्यंत निसर्गरम्य वातावरण पाहायला मिळते. जीवनेश्वराचे दर्शन घेण्याअगोदर त्या ठिकाणी पिंपळाच्या झाडाखाली असलेले हनुमानाचे मंदिर व त्याच्या बाजूला असलेली पाण्याची पोखरण ही सुद्धा खूप प्राचीन आहे. मंदिरात दर्शन घेण्या अगोदर या पोखरणी वरील पायऱ्यांनी खाली उतरून पाय धुवून मग देवळात प्रवेश करण्याची परंपरा आहे. मंदिरामध्ये प्रवेश करताना भव्य अशी नंदीची पाषाणी मूर्ती आहे. मंदिराच्या आत मध्ये संगम रवरी नंदी असून गाभाऱ्यामध्ये श्री स्वयंभू जीवनेश्वराची पिंडी आहे.

आज पहिला श्रावणी सोमवार असल्यामुळे मंदिरामध्ये भक्तांची गर्दी होती. तसेच अनेक धार्मिक कार्यक्रम देखील सुरू होते. पुरोहितांकडून लघुरुद्र करण्यात येत होते, तर अनेक भाविक १००० बेलपाने वाहण्यासाठी ही मंदिरामध्ये उपस्थित होते. या ठिकाणी जीवनेश्वराच्या गाभाऱ्यामध्ये धोतर किंवा टॉवेल लावून उघड्याने प्रवेश दिला जातो. जे भाविक त्या ठिकाणी बेल वाहण्यासाठी येतात त्यांना सुद्धा धोतर किंवा सोवळे नेसणे बंधनकारक असते. धोतर किंवा सोवळे नेसलेल्या भाविकांनाच आपल्या पत्नीला घेऊन गाभाऱ्यात जाता येते. श्रावण मास हा हिंदू धर्मियांचा पवित्र महिना मानण्यात येतो. यावेळी प्रत्येक सोमवारी विविध ठिकाणच्या महादेव मंदिरांमध्ये भक्त दर्शनासाठी जात असतात.

श्रीवर्धन या ठिकाणी असलेल्या बंदराला सुद्धा या मंदिरामुळेच जीवनाबंदर असे नाव पडले आहे. अनेक भक्त जिवनेश्वराच्या दर्शनाला जाताना सफेद कपडे परिधान करतात. महादेवाला पांढरी फुले प्रिय असतात. त्याचप्रमाणे महादेवाची भक्ती करणारे सुद्धा त्यामुळे सफेद कपडे परिधान करतात.

दुपारच्या वेळेस मंदिरामध्ये ग्रंथ वाचन करण्यात येते. तर अनेक भक्त शिवलीलामृताचे पारायण देखील करत असतात. जीवनेश्वराची स्वयंभू असलेली पिंडी दर वर्षाला एका तिळाएवढी वाढते अशी आख्यायिका सांगितली जाते. या आख्यायिकेनुसार जीवनेश्वर मंदिरात श्रावण महिन्यात परंपरा जपली जाते.

## शिव मंदिरात पहिल्याच श्रावण सोमवारी शिवशंभोचा गजर

**। आगरदंडा । प्रतिनिधी ।**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभु समाज व देवस्थान ट्रस्ट मुरुड गुरव पाखाडी येथील शिव मंदिरात पहिल्याच श्रावण सोमवारी शिवशंभोचा गजर करत शिवभक्तांनी अलोट गर्दी केली होती.



शहरातील गुरव पाखाडी शेकडो वर्षांपूर्वी प्राचीन शिव मंदिरात पहिल्या पूजेचा मान नयन कर्णिक त्यांच्या पत्नी नौनिता कर्णिक यांना मिळाला. पहाटे शिव शंकराच्या पिंडीवर बेलाची पाने व दुधाने विधीवत पूजा करुन सहस्त्र बेल भगवान शंकराला अर्पण करण्यात आला. त्यानंतर पुजा आरती करुन भक्तांना मंदिरात दर्शनासाठी प्रवेश देण्यात आला. ॐ नमः शिवाय, हर हर महादेवच्या गजरात शिवभक्त गणांनी शिवलिंगावर बेल फुल वाहुन पूजा करायला मिळाली. त्यामुळे चिमुकल्यांपासुन ते वृद्धापर्यत मंदिरात मंदिरातील गाभाऱ्यात पूजेसाठी उपस्थित राहण्याची संधी मिळाली.

## नागपंचमीनिमित्त अशोक बागेत नागप्रतिमेची पूजा

**। खांदा कॉलनी । वार्ताहर ।**

नागपंचमीनिमित्त अशोक बाग, पनवेल येथे सकाळपासूनच भाविकांची वर्दळ पाहायला मिळाली. अशोक बाग परिसरातील नागप्रतिमेची पूजा करण्यासाठी महिला वर्ग मोठ्या संख्येने दाखल झाला होता. नागपंचमीच्या निमित्ताने नागरिकांनी श्रद्धेने नागदेवतेचे पूजन केले. नागप्रतिमेवर भाविकांनी पाणी आणि दूध अर्पण केले. महिलांनी नागदेवतेला फुले, हळद-कुंकू आणि नैवेद्य अर्पण केला. पूजेसाठी आलेल्या महिलांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळत होता.



नागदेवतेसमोर खीर, लाह्या, पुरी आदी पदार्थांचा नैवेद्य ठेवण्यात आला होता. अनेक महिलांनी कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी नागदेवतेची मनोभावे पूजा केली. नागपंचमीच्या पारंपरिक प्रथांचे पालन करत नागरिकांनी श्रद्धेने पूजाविधी केला. सकाळपासून परिसरात पूजा करण्यासाठी नागरिकांची ये-जा सुरू होती. महिलांनी नागपंचमीच्या शुभेच्छा देत सणाचा आनंद घेतला.

# नागपंचमी भक्तिमय वातावरणात साजरी

**। म्हसळा । प्रतिनिधी ।**

नागपंचमी आणि पहिल्या श्रावणी सोमवारचे औचित्य साधून परिसरातील शिवमंदिरांमध्ये भक्तिमय वातावरणात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. पहाटेपासूनच भगवान शंकराच्या दर्शनासाठी भाविकांनी मंदिरांमध्ये गर्दी केली होती. हर हर महादेव, ॐ नमः शिवायच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला.

या पवित्र दिवशी भगवान शंकराला एक हजार बेलपानांसह अभिषेक करण्यात आला. विधिवत पूजा-अर्चा, रुद्राभिषेक, जलाभिषेक, दुग्धाभिषेक तसेच बेलपत्र अर्पण करून महादेवाची आराधना करण्यात आली. यावेळी



भाविकांनी श्रद्धेने बेलपान, फुले, दूध, फळे व नैवेद्य अर्पण करून भगवान शंकराचे दर्शन घेतले.

नागपंचमीच्या निमित्ताने नागदेवतेचे पूजनही करण्यात आले. नागपंचमी आणि श्रावण सोमवार हा धार्मिकदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा दिवस मानला जात असल्याने महिला, पुरुष तसेच लहान मुलांनी मोठ्या श्रद्धेने पूजाविधीत सहभाग घेतला.

मंदिरात भक्तिगीते, भजन आणि मंत्रोच्चार सुरू होते. भाविकांनी उपवास करून भगवान शंकराची मनोभावे पूजा केली. दिवसभर मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते.एक हजार बेलपानांचा अभिषेक हा या धार्मिक सोहळ्याचा विशेष आकर्षण ठरला. महादेवाला बेलपत्र अर्पण करताना भाविकांनी आपल्या कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी, आरोग्यासाठी आणि सर्वांच्या मंगलमय भविष्यासाठी प्रार्थना केली. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवारला भगवान शंकराच्या उपासनेला विशेष महत्त्व आहे. त्यामुळे पहिल्याच श्रावणी सोमवारला भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून धार्मिक परंपरा जपत महादेवाचे दर्शन घेतले. या संपूर्ण सोहळ्यामुळे परिसरात श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

# पहिल्याच श्रावणी सोमवारी वाघेश्वर मंदिरात भक्तांची मांदियाळी

**। खांब । प्रतिनिधी ।**

श्रावण महिन्यातील पहिल्याच श्रावणी सोमवारी रोहा तालुक्यातील जागृत देवस्थान असलेल्या वाघेश्वर महाराज भगवान शंकराच्या दर्शनासाठी भाविकांनी मोठ्या संख्येने मंदिरांकडे धाव घेतली.

भक्तिमय वातावरणात हर हर महादेव, बम बम भोलेच्या जयघोषाने मंदिर परिसर दुमदुमून गेला. वाघेश्वर मंदिरात पहाटेपासूनच भाविकांची



मांदियाळी पाहायला मिळाली. पहाटेच्या सुमारासच भाविकांनी मंदिरात दर्शनासाठी रांगा लावल्या. भगवान वाघेश्वराच्या दर्शनासाठी आलेल्या भाविकांमध्ये मोठा उत्साह आणि भक्तिभाव दिसून येत होता. वाघेश्वर हे परिसरातील जागृत देवस्थान म्हणून भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र मानले जाते. या देवस्थानची कीर्ती दूरवर पसरलेली असल्याने श्रावण महिन्यात विशेषतः प्रत्येक सोमवारी येथे भाविकांची मोठी गर्दी होत असते. पहिल्याच श्रावणी सोमवारी मंदिरात झालेली गर्दी ही भाविकांच्या अढळ श्रद्धेचे दर्शन घडविणारी ठरली.

## खांदेश्वर मंदिरात भाविकांची गर्दी

**। खांदा कॉलनी । वार्ताहर ।**

श्रावण महिन्याच्या पहिल्या श्रावणी सोमवारी खांदा वसाहतीतील पुरातन खांदेश्वर मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली. पहाटेपासूनच भगवान खांदेश्वराच्या दर्शनासाठी भाविकांनी मंदिरात रांगा लावल्या होत्या. महिला, पुरुष तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने दर्शनासाठी उपस्थित होते.

मंदिरात पूजाअर्चा आणि अभिषेक करण्यात आला. भाविकांनी भगवान शिवाला बेलपत्र आणि दुग्धाभिषेक अर्पण केला. मंदिर परिसरात ॐ नमः शिवायचा अखंड गजर सुरू होता. हर हर महादेव आणि जय जय भोलेनाथच्या घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. श्रावणातील पहिल्या सोमवारी शिवभक्तांमध्ये विशेष उत्साह पाहायला मिळाला. खांदेश्वर मंदिर परिसरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

# दक्षिण काशीत भक्तीचा महासागर

## श्रावणी सोमवारी चौलच्या प्राचीन रामेश्वर मंदिरात भाविकांची अलोट गर्दी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रायगडच्या ऐतिहासिक भूमीत वसलेली चौल नगरी ही केवळ प्राचीन बंदरनगरी म्हणूनच नव्हे, तर दक्षिण काशी म्हणूनही ओळखली जाते. श्रावण महिन्यातील प्रत्येक सोमवार हा येथे भक्ती, श्रद्धा आणि अध्यात्माचा उत्सव ठरतो. चौलचे ग्रामदैवत असलेल्या प्राचीन श्री रामेश्वर मंदिरात श्रावणी सोमवारच्या निमित्ताने हजारो भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली असून संपूर्ण परिसर हर हर महादेवच्या जयघोषाने दुमदुमून गेला.

चौल ही हजारो वर्षांची ऐतिहासिक परंपरा लाभलेली नगरी आहे. इतिहासात चंपावती, रेवतीक्षेत्र आणि चौल अशा



विविध नावांनी प्रसिद्ध असलेल्या या भूमीचा उल्लेख प्राचीन ग्रंथांमध्ये आढळतो. एकेकाळी देश-विदेशातील व्यापारासाठी प्रसिद्ध असलेले हे बंदर आजही आपल्या धार्मिक, सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वैभवामुळे भाविक व पर्यटकांना आकर्षित करत आहे. चौलमध्ये पूर्वी शेकडो मंदिरे आणि तळी असल्याच्या नोंदी आढळतात. त्यामुळेच या नगरीला मंदिरांची नगरी आणि दक्षिण काशी अशी ओळख प्राप्त झाली आहे.

या पवित्र भूमीतील श्री रामेश्वर मंदिर हे चौलचे ग्रामदैवत मानले जाते. मंदिराची भव्य वास्तू, समोरील विशाल पुष्करणी, दीपमाळ, नंदीमंडप आणि पारंपरिक कोकणी स्थापत्यशैली पाहताच भाविक भारावून जातात. मंदिराच्या गाभाऱ्यात स्वयंभू शिवलिंग विराजमान असून त्याबद्दल स्थानिकांच्या मनात प्रचंड श्रद्धा आहे. मंदिराचा इतिहास अनेक शतकांपूर्वीचा असल्याचे मानले जाते. मराठेशाहीच्या काळात नानासाहेब पेशवे, मानाजी आंग्रे आणि विसाजीपंत सरसुभेदार यांनी या मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी विशेष योगदान दिल्याची ऐतिहासिक नोंद उपलब्ध आहे.श्रावण महिन्यात रामेश्वर मंदिरात भक्तीचा महासागर उसळतो. पहिल्या श्रावणी सोमवारपासून धार्मिक कार्यक्रम, भजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह आणि विविध पूजाविधींना प्रारंभ होतो. पहाटेपासूनच दर्शनासाठी रांगा लागतात. अनेक भाविक पायी चालत येऊन महादेवाचे दर्शन घेतात. मंदिर परिसरातील नारळी-पोफळींच्या बागा, शांत वातावरण आणि भक्तिमय स्वरांनी भरलेला परिसर भाविकांना एक वेगळाच आध्यात्मिक अनुभव देतो. रामेश्वर मंदिराचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे येथे असलेली अग्निकुंड, वायुकुंड आणि पर्जन्यकुंड ही प्राचीन धार्मिक स्थाने. दुष्काळी परिस्थितीत पर्जन्यकुंड उघडण्याची परंपरा शेकडो वर्षांपासून चालत आली आहे.

## निवडक

### नांदगावच्या नागेश्वर मंदिरात भाविकांनी घेतले दर्शन

**आगरदांडा :** श्रावण शुक्ल पंचमी नागपंचमीच्या निमित्ताने नांदगावच्या नागेश्वर नगरातील नागेश्वर मंदिरात येथील नांदगाव, माजगाव यशवंतनगर पंचक्रोशीसह मुरुड तालुक्यातील अनेक भाविकांनी नागोबा देवाचे दर्शन घेतले. नांदगाव ग्रामपंचायतीचे माजी सरपंच बाळ महादेव विरकुड यांच्या मालकीच्या नागेश्वर नगरातील आंब्याच्या बागेत पूर्वापार असलेल्या नागोबा मंदिरातील मूर्तीची पहाटे सुदेश वाणी व स्वप्निल कांबळे यांनी पूजा केल्यानंतर दर्शनासाठी मंदिरात भाविकांची मोठी गर्दी झाली होती. यावेळी भाविकांनी नागवेली, दुर्वा, हार, पेढे, फुले, नारळ, अगरबत्ती, भाजलेले पंचखाद्य आदी साहित्यांनी पूजा करून नागोबाला मोठ्या भक्तिभावाने दूधही पाजले. मंदिराच्या समोरील आवारात झाडाच्या बुडाशी असलेल्या सापाच्या प्रत्यक्ष वावर असलेल्या मातीच्या वारुळ अर्थात सापाचे बीळ म्हणजेच त्याच्या वारूळाची पूजा करून तथेही दूध अर्पण करण्यात आले. येथे दिवसभरात पावसाच्या काही तुरळक सरी पडत असल्याने मंदिरात दर्शनासाठी गर्दी केली. नागोबाला उकडीच्या मोदकांचा नैवेद्य यावेळी दाखविण्यात आला. या दिवशी घरोघरीही केळीच्या पानावर नाग काढून अथवा शाडूची माती किंवा पिठापासून बनवलेल्या नागाच्या मूर्तीचे पूजन करण्यात आले होते.



• (छायाचित्र : गणेश चोडणेकर)



### महादेवाच्या मंदिरात भाविकांची गर्दी

**उरण :** पूर्वाश्रमीच्या अपरांत म्हणजेच सध्याच्या कोकण प्रांतातील चिरनेर हे पुरातन इतिहासाचा वारसा सांगणारे सुंदर गाव! रायगड जिल्ह्यातील उरण तालुक्यात हे ऐतिहासिक गाव निसर्गसंपन्न डोंगरकुशीत वसले आहे. गावात अठरापगड जातींची वस्ती आणि त्या अनुसरून गावात पुरातन मंदिरांची संख्याही लक्षणीय!! चिरनेरचे महागणपती देवस्थान तर सुपरिचित आहेच पण शिलाहार राजवटीचा इतिहास सांगणारे शंभू महादेवाचे ही प्राचीन स्वयंभू देवस्थान चिरनेर गावात आहे.श्रावणातील पहिल्या सोमवारी अनेक शिव भक्तांनी शिवलिंगाच्या दर्शनासाठी पहाटे पासून गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत होते. चिरनेरच्या प्राचिनतेचा इतिहास सुमारे १२०० वर्षांपूर्वीच्या शिलाहार राजवटीशी जोडला गेला आहे. बिंब राजाची अपरांत प्रांतावर अधिसत्ता होती. माहीम ते मालवण पर्यंत त्याचे साम्राज्य पसरले होते. या राजवटीत त्याने अनेक बंदरे विकसित केली. त्यात चिरनेर या बंदराचाही समावेश होतो.या बंदरातून पूर्वी मोठ्या प्रमाणात मुंबई प्रांताशी व्यापार चालायचा त्यामुळे व्यापाराच्या उद्देशाने या गावात अठरापगड जातीच्या लोकांची वस्ती झाली. गावाच्या निसर्ग सौंदर्यामुळे शिलाहार राजवटीत या गावात अनेक लहानमोठी मंदिरे उभारली गेली. त्यामध्ये शंभू महादेवाचे मंदिरही उभारले गेले. सध्या हे शंभू महादेवाचे मंदिर हजारो भाविकांचे श्रध्द-स्थान बनले आहे.श्रावण मासानिमित्त पहिल्याच सोमवारी चिरनेर गावात शंभू महादेवाच्या दर्शनासाठी भाविकांनी विशेषत: महिला भाविकांनी पहाटे पासून गर्दी केल्याचे चित्र पाहायला मिळत होते.



### आवास येथे एड्स जनजागृतीपर अभियान

**अलिबाग :** आंतरराष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने बी.एन. ज्युनियर महाविद्यालय आवास -अलिबाग येथे महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई यांच्या मार्गदर्शक सूचनेनुसार जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग अलिबाग व आयसीटीसी विभाग ०२ आणि जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने इंटिसिफाईड आय ई सी कॅम्पेन अभियानाचे आयोजन करण्यात आले होते. सदर याप्रसंगी ८९ विद्यार्थ्यांना एचआयव्ही, एड्स आजार जनजागृतीपर या कार्यक्रमप्रसंगी माहिती दिली. या कार्यक्रमाच्या वेळी प्राचार्य ए.बी. दारकुंडे आणि प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थितीत जिल्हा रुग्णालय अलिबाग-रायगड येथील आय.सी.टी.सी विभागाच्या समुपदेशक कल्पना गाडे यांनी एचआयव्ही एड्स आजार होण्याची कारणे, उपचार आणि आजार झाल्यावर घ्यावयाची काळजी याबद्दल सखोल मार्गदर्शन व जनजागृती पर माहिती उपस्थितांना दिली तसेच प्रयोगशाळा तंत्रज्ञ अमित सोनवणे यांनी एचआयव्ही एड्स प्रतिबंध २०१७ कायद्याबाबत सुद्धा माहिती देण्यात आली. तसेच एचआयव्हीएड्स जनजागृतीपर पोस्टर्सचे वाटप करण्यात आले. तसेच इंटेन्सिफाईड आयईसी कॅम्पेन अंतर्गत महाविद्यालयात संवेदीकरण कार्यक्रमात सहभागी झाल्याबद्दल शासनातर्फे प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

## क्लासिफाईड
जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

• नागावमधील हॉटेलमध्ये काम करण्यासाठी स्टाफची आवश्यकता आहे. रिसेप्शनिस्ट, वेटर, हाऊसकिपर, इंडियन चायनीज कुक, इच्छुक उमेदवारांनी सकाळी ९ ते ६ या वेळेत संपर्क साधावा अथवा व्हॉटसअॅप वर मेसेज करावा. मोबाईल-७५५९१८४६१२

• ऑफिस स्टाफ आवश्यक Tanna Consultancy शॉप नं. १ शारदा CHS, महावीर चौक, बेल्जियम वॅफल समोर, अलिबाग, जि. रायगड संपर्क : ९९२३७५०५४९, ९१०५७१७०३८ इच्छूक उमेदवारांनी संपर्क साधावा.

• गाळा भाड्याने मिळेल. ९४२३३७५१९८/८४११०१६४४४

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# खोपोलीत शेकडो नागरिकांचे रक्तदान

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिन केवळ ध्वजारोहणापुरता मर्यादित न ठेवता सामाजिक बांधिलकीची जाणीव जागविण्याचा प्रयत्न खोपोलीत करण्यात आला. बूज हास्य क्लबच्या वतीने १५ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आलेल्या रक्तदान शिबिराला शेकडो नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. रक्तदान हेच महादान हा संदेश देत नागरिकांनी सामाजिक दायित्वाची जाणीव जपली. या उपक्रमाला सामाजिक उपक्रमाची जोड देत विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव करण्यात आला.

**म.रा.मा.प. महामंडळ रायगड विभाग, पेण .**
**विभाग नियंत्रक यांचे कार्यालय- स्थापत्य शाखा**

## शुध्दिपत्रिका

**विभागीय अभियंता म.रा.मा.प.महामंडळ रायगड विभाग पेण, यांनी निविदा सूचना ०४-२०२६-२७ दिनांक ३१.०७.२०२६ नुसार रा.प रायगड विभागातील स्थापत्य कामांबाबत निविदा मागविल्या होत्या. सदरील निविदा सादर करण्यांची शेवटची तारीख हि १७.०८.२०२६ होती. परंतू तांत्रीक अडचणीमुळे सदरील निविदा कालावधी हा दिनांक २४.०८.२०२६ पर्यंत वाढविण्यांत येत आहे.**

**विभागीय अभियंता**
**रा.प.रायगड विभाग पेण**

## Change In Name

I have change my Old Name from SUTHAR PRAVEEN KUMAR VELARAM to New Name PRAVEEN VELARAM SUTHAR as per affidavit no 68AB581683

## PUBLIC NOTICE

To Whom It May Concern,
This is to notify the general public that Late Shri Kazi Abdul Hakim Talyai, R/O Dattawadi
(previously known as Vaitagwadi),expired on 09/05/2021 at NA319, Cosmopolitan CHS., Takka, Panvel Raigarh 410206.
The deceased left behind the following joint- immovable property:
Property Details: CTS NO 536&537
Owned by: Late Shri Kazi Abdul Hakim Talyai along with Late. Kazi Abdul Rashid Talyai, Late Kazi Bashir Mohammad Hussain Talyai & Late Kazi Mushtaq Mohammad Hussain Talyai as per CTS Card 536 & 537.
The deceased has left behind the following persons as his/her sole legal heirs:

1. Smt. Sarvatara Abdul hakim kazi, Relation: Wife Age:80
2. Mrs. Ayesha Riyaz Mankiware, Relation: Daughter, Age:56
3. Mustafa Abdul Hakim Kazi, Relation: son Age:53
4. Sanjeeda Hasib Mulla, Relation: Daughter, Age:50
5. Nuzhat Hussain Mukadam, Relation: Daughter, Age:49
6. Muratza Abdul Hakim Kazi, Relation: son Age:48
7. Mujtaba Abdul Hakim Kazi,, Relation: son Age:42
8. Mohammed Abdul Hakim Kazi,, Relation: son,Age:40

It is hereby informed that the above-named persons are the only legal heirs of the deceased Late Shri Kazi Abdul Hakim Talyai and no other person other than above named persons as the legal heir has any right, title, interest or claim in the said property. If any person has any objection or claim, right, title, interest in respect of the said property by way of Will, Gift, Sale, Mortgage, Lien, Possession, or otherwise, they are requested to submit their claim in writing with supporting documents to the undersigned within 15 days from the date of publication of this notice. Failing which, it shall be presumed that no other person has any claim or objection and the above-named legal heirs shall proceed further for mutation/transfer/succession of the said property without any further notice.

Date: / /2026
Place: Panvel, 410206
Maharashtra
For and on behalf of Legal Heirs
Adv. Anjum Ismail Deshmukh

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे दिवीपारंगी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) चिन्मय रघूनाथ गोखले २) माधव यशवंत गोखले ३) भारती शिरीष जोशी ४) रेवती रविंद्र जोशी यांचे कडुन कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.चौ.मी) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| दिवीपारंगी, ता.अलिबाग | २३/५/अ | ०-१३-०० जिरायत<br>०-०२-०० पो.ख.<br>०-१५-०० एकुण | ०.२३ |

वर वर्णन केलेली जमिन मिळकत सदर नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष ताबेकब्जा वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे. असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण - अलिबाग
दिनांक - १७/०८/२०२६

**ॲड. विराज शरद अंबुकर**
मु.हनुमान वाडी, थेरोंडा, पो.चौल,
ता.अलिबाग, जि.रायगड
मोबा.क्र.९०२८८५१२८०

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.११३/३ प्लॉट नंबर १ क्षेत्र ४६४ चौ.मी. मधील श्री. मंगलमुर्ती निवासी सहकार गृहनिर्माण संस्था मर्या. ता.अलिबाग, जि. रायगड. खालील वर्णनाची निवासी सदनिका मिळकतीचे विद्यमान मालक १.मनोज जयराम भगत. रा. रूम नं. ३, चाळ नं. ३, काजुपाड, बोरीवली मुंबई यांचेकडून आमचे अशिल सौ. रचना राजेश राउत यांनी कायम खरेदी करण्याचे ठरविले असून व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला असून सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबतचा शोध घेणेकरिता व त्या मिळकतींचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहिर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चेंढरे ग्रामपंचायत हद्दीतील सर्व्हे नं.११३/३ प्लॉट नंबर १ क्षेत्र ४६४ चौ.मी. मधील श्री मंगलमुर्ती निवासी सहकार गृहनिर्माण संस्था मर्या. तळमजला निवासी सदनिका क्रं.३, मालमत्ता क्रं. ८२२/३, क्षेत्र. ५६३ चौ. फुट बिल्टअप ही निवासी सदनिका.

तरी, सदर मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, पतसंस्थेच्या कर्जाचा बोजा आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची सदर मिळकतींच्या वि क्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या ०७ दिवसांचे मुदतीचे आत आपली हरकत योग्य त्या संबधीच्या कागदपत्री पुराव्यानिशी खालील सही करणार यांजकडे लेखी नोंदवावी.

येणे प्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतींचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : १७/०८/२०२६

**ॲड. रसिका अमर जोशी.**
मु.नवखार, पो.सुडकोली
ता.अलिबाग, जि.रायगड

## जाहीर सुचना

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे उमटे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. अंकुश रामचंद्र केणी, श्री. पांडुरंग रामचंद्र केणी व श्री. लहु रामचंद्र केणी, राहणार पनवेल, यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर जमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाची बोलणी सदर मिळकतींचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान पुर्ण झाली आहेत. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्या बाबतचा हवाला सदर मिळकतींच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. अंकुश रामचंद्र केणी, श्री. पांडुरंग रामचंद्र केणी व श्री. लहु रामचंद्र केणी यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, त्यांचे मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध आहे, असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वानी नोंद घ्यावी, हे सर्वास कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| उमटे, ता.अलिबाग | ९३ | ०-९६-६०<br>पो.ख.०-२४-८०<br>एकूण १-२१-४० | ११-५६ |

अलिबाग,
दिनांक : १८/०८/२०२६

सही /-
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग- रायगड.
खरेदीदारांचे वकील

## जाहीर नोटीस

या जाहिर नोटीशीद्वारे सर्व संबंधितांना कळविणेत येते की, खालिल नमुद मिळकतीचे मालक सौ. आरती संदीप भोईर आणि श्री. प्रसाद अशोक भोपतराव यांनी त्यांची खालिल नमुद मिळकत आमचे अशिलांना विकत देणेचे ठरविले आहे.

**मौजे कोंदिवडे, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत**

| भुमापन क्रमांक | भुमापन क्र. चा उपविभाग | क्षेत्र हे.आर. | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ४ | २ | ०-१९-२०<br>पो.ख.०-००-५० | ३-५० |
| | | एकूण ०-१९-७० | |

वरील नमूद मिळकत व त्यामधील तदंगभुत हक्कहितसंबंध सद्धा.

सदर जमिन मिळकतीबाबत विक्री करण्याचा प्रस्ताव असून, सदर मिळकतीबाबत कोणत्याही व्यक्तीचा मालकी हक्क, वारसा हक्क, ताबा, गहाण, बोजा, करार, हक्कसंबंध अथवा अन्य कोणताही दावा/हरकत असल्यास त्यांनी या नोटीसच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून ७ (सात) दिवसांचे आत आवश्यक कागदपत्रांसह खाली नमुद केलेल्या पत्त्यावर लेखी स्वरुपात कळवावे.

विहित मुदतीत कोणतीही हरकत अथवा दावा प्राप्त न झाल्यास, सदर मालमत्तेबाबत कोणाचाही दावा/हरकत नाही असे गृहित धरुन पुढील विक्री व्यवहार करण्यात येईल. त्यानंतर प्राप्त होणाऱ्या कोणत्याही दाव्यास विक्रेता जबाबदार राहणार नाही.

दि. १७ ऑगस्ट २०२६

सही/-
खरेदीदारातर्फे ॲडव्होकेट
**ॲड.सारिका भास्कर मुने**
ऑफिस पत्ता स्वप्ननगरी, शॉप नं. ९
गुरुनगर रोड, मुद्रे खुर्द, ता. कर्जत, जि. रायगड.
मो नं. ७०३०५४४७८८/८७६६५०३०१९

## जाहीर नोटीस

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल १). श्री. यश प्रफुल चंदाराणा, २) श्री. प्रफुल कन्हयालाल चंदाराणा यांनी खालील वर्णन केलेली मिळकत तीचे मालक श्री. सत्येन्द्र मुन्शी चौहान यांचे कडून विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मौजे. ताडवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील सर्व्हे नं. १०२, प्लॉट नं. ३८ ते ६७ यामिळकती वरील "ब्लिस स्टुडीओ" या इमारतीमधील, ए-विंग, चौथ्या मजल्यावरील फ्लॅट नं. ४२६, फ्लॅट क्षेत्र २१.९१ चौ. मी. कारपेट, + टेरेस ४.६२ चौ. मी. ही फ्लॅट मिळकत.**

तरी वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत इतर दुसरे कोणाचा साठेकरार, खरेदीखत, ताबा कब्जा, वहीवाट, गहाण, दान, बक्षीसपत्र, लिज, वगैरे अथवा अन्य इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास सदर मिळकत ही निर्वेध व बोजारहीत आहे असे गृहीत धरून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून येणारी हरकत आमचे अशिलावर बंधनकारक राहणार नाही. कळावे.

दि. १८/०८/२०२६.

**ॲड. नरेश रामदास आहीर.**
पत्ता - शॉप नं. १२, शिवगंगा
अपार्टमेंन्ट, ब्राम्हणआळी, नेरळ
ता.कर्जत, जि.रायगड - ४१०१०१.
मो.-९३२५०६००३७/९०११२९२९८७.

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालील प्रमाणे.

०१) मौजे किहिम, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकती.

| मौजे | गट नं. | क्षेत्र हे. आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|
| किहिम | ३०० | ०.४९.२ | ३.६४ |
| किहिम | ३५७ | ०.४५.० | ३.२८ |
| किहिम | ३०८ | ०.०५.१ | ०.३७ |
| किहिम | ३६३ | ०.०९.९ | ०.८४ |

येणे प्रमाणे वर्णनाचे जमिन मिळकतीस जुने वर्णन अनुक्रमे मौजे किहिम गट नं. ६९९, गट नं. ७५७, गट नं. ७०८ व गट नं. ७६३ असे वर्णन होते. सदरहु मिळकत या नोटीशीचा विषय असुन सोईच्या दृष्टीने या मिळकतीस यापुढे सदरहु मिळकत म्हणुन संबोधण्यात येत आहे.

सदरहु मिळकत ०१) श्रीमती वैशाली जनार्दन सातुपे, ०२) सौ.निता जनार्दन सातुपे, ०३) मिलन जनार्दन सातुपे विवाहानंतर सौ.मिलन सचिन सोंदळकर, मु.रूम नं. २२२, शितळादेवी गृहनिर्माण सोसायटी, डि विंग, डी.ए. नगर, अंधेरी (प), मुंबई, ०४)सारिका जनार्दन सातुपे विवाहा नंतर सौ.वृंदा संजय कांबळे, मु.रूम नं.२४, तिसरा मजला, सि विंग, बि.एस.टी. कॉटर्स, वडाळा बस डेपोच्या मागे, वडाळा, मुंबई, ०५) सविता जनार्दन सातुपे विवाहा नंतर सौ.सविता प्रताप मांडवकर, मु.रूम नं. ५, ई-१२१, शिवाली सोसायटी, सेक्टर नं.१२, खारघर, पिनकोड नं. ४१०२१० ०६) नुतन जनार्दन सातुपे विवाहानंतर सौ.स्वरा सचिन जगे, मु.रूम नं. २१२/२, मोहित अपार्टमेंट, दुसरा माळा, विठ्ठल मंदिरामागे, ब्राम्हण आळी, शिवाजी चौक, भिवंडी, ता. भिवंडी, जि.ठाणे आणि ०७) श्री.नितिन जनार्दन सातुपे, मु.पो.किहिम, ता.अलिबाग, जि. रायगड यांनी माझे आशिल यांस दिनांक १९.०५.२०१२ रोजीचे साठेकराराने खरेदी देण्याचे मान्य केले होते. वर नमुद इसम/व्यक्ती यांनी माझे आशिल यांचा हक्क डावलुन सदरहु मिळकतीत त्रयस्तांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्न केल्याने माझे आशिल यांनी सदर व्यक्तींचे विरूद्ध मा. दिवाणी न्यायालय, अलिबाग येथे दिनांक १९.०५.२०१२ रोजीचे कराराची विशेष पुर्तता करून मिळणे व इतर मागण्यांकरीता स्पेशल मुकदमा क्र. ७६/२०१५ चा दावा दाखल केला आहे. सदरचा दावा सध्या प्रलंबित असुन दिवाणी न्यायालयाने सदर व्यक्तींनी सदरहु मिळकतीमध्ये त्रयस्तांचे हक्क हितसंबंध निर्माण करू नये, असा तुर्तातुर्त ताकीदीचा आदेश केला आहे.

आता माझे आशिल यांना असे समजले आहे की, ०१) श्रीमती वैशाली जनार्दन सातुपे, ०२) नुतन जनार्दन सातुपे विवाहा नंतर सौ. स्वरा सचिन जगे आणि ०३) श्री.नितिन जनार्दन सातुपे, हे सदरहु मिळकती त्यांचे वैयक्तिक नावे नोंदल्या आहेत, याचा गैरफायदा घेवुन सदरहु मिळकतीत त्रयस्तांचे हक्क हितसंबंध निर्माण करण्याचा प्रयत्नात आहेत. दिनांक १९.०५.२०१२ रोजीचा साठेकरार अस्तित्वात असताना ०१) श्रीमती वैशाली जनार्दन सातुपे, ०२) नुतन जनार्दन सातुपे विवाहा नंतर सौ. स्वरा सचिन जगे आणि ०३) श्री. नितिन जनार्दन सातुपे यांस संदर्भित मिळकतीची विक्री करणेचा अधिकार नव्हता व नाही.

सबब, या जाहीर नोटीशी अन्वये सर्व लोकांस कळविण्यांत येते की. ०१) श्रीमती वैशाली जनार्दन सातुपे, ०२) नुतन जनार्दन सातुपे विवाहा नंतर सौ.स्वरा सचिन जगे आणि ०३) श्री.नितिन जनार्दन सातुपे यांचेशी संदर्भीत मिळकती बाबत कोणीही कोणत्याही स्वरूपाचा खरेदी, विक्री, साठेकरार व अन्य व्यवहार करू नये. त्यास माझे आशील यांची सक्त हरकत आहे. याउपरही कोणीही बेकायदेशीरपणे अशा प्रकारे व्यवहार केल्यास तो माझे आशील यांजवर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी. कळावे.

अलिबाग
तारीख १७.०८.२०२६

**ॲड.एस.वाय.बारटके**
मु.पो.ता.अलिबाग, जि.रायगड

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

**- मुख्य संपादक**

## कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड

**(भारत सरकारचा उपक्रम )**

सादर सेवा

**ई-निविदा आमंत्रण सूचना**

उप मुख्य अभियंता (कार्य), कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड, रत्नागिरी पात्र कंत्राटदारांकडून खालील कामासाठी आयआरईपीएस पोर्टलवर ई-टेंडरिंगद्वारे खुली निविदा एक पाकिट बोली प्रणाली आमंत्रित करीत आहेत: **कामाचे नाव**: सिंधुदुर्ग स्थानकावरील प्लॅटफॉर्म शेल्टर गटर, कोटा शेडची दुरुस्ती, झाराप स्थानकावरील मॉड्युलर शेल्टर, कुडाळ स्थानक आणि सावंतवाडी स्थानकावरील वाहन शेड, सौर पॅनेल काढून कुडाळ स्थानक इमारतीमध्ये पीजीआय रूफ शीटिंग उपलब्ध करून देणे तसेच प्लॅटफॉर्म क्र. 2 वरील कोटा शेडच्या जुन्या टाइल्स बदलणे. **निविदा सूचना क्र.: केआर-आरएन-डीवायसीईडब्ल्यू-एमआयएससी-14-2026, दिनांक: 18.08.2026. एकूण अंदाजित किंमत**: रु.38,87,574.87 (जीएसटी वगळून). **बोली सुरू होण्याची तारीख**: 25.08.2026. **ऑनलाइन प्रस्ताव / बोली सादर करण्याची अंतिम तारीख/वेळ**: 08.09.2026 रोजी 15:00 वाजेपर्यंत. **पूर्णत्वाचा कालावधी**: 4 महिने. मॅन्युअल प्रस्ताव स्वीकारले जाणार नाहीत. तपशील / सहभागासाठी **https://www.ireps.gov.in** या संकेतस्थळाला भेट द्यावी आणि शुद्धिपत्रक / परिशिष्ट केवळ याच संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल.

## मुरूड जंजिरा नगरपरिषद, जि. रायगड
## नगर पथविक्रेता समिती निवडणूक २०२६

पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम २०१४ अंतर्गत महाराष्ट्र (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ मधील नियम १४ (२) अंतर्गत मुरूड जंजिरा नगरपरिषद हद्दीमधील नोंदणीकृत पथविक्रेत्यांमधून ०८ जणांची नगर पथविक्रेता समितीमध्ये निवड करावयाची असून निवडून द्यावयाच्या सदस्यांपैकी एकूण ०३ जागा महिलांसाठी राखीव असल्याने निवडणूक निर्णय अधिकारी श्रीम. राखी गावडे यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १७/०८/२०२६ रोजी दुपारी ३.०० वाजता नगरपरिषद सभागृह येथे सदर राखीव जागांबाबत महिला आरक्षण सोडत काढण्यात आली. त्यानुसार महिला आरक्षण सोडती नंतर निवडून द्यावयाच्या पदांची आरक्षण स्थिती पुढीलप्रमाणे -

| अ. क्र. | आरक्षित जागेचा तपशिल | महिलांकरीता राखीव | सर्वसाधारण | एकूण |
|---|---|---|---|---|
| १ | सर्वसाधारण प्रवर्ग | ०१ | ०२ | ०३ |
| २ | अनुसूचित जाती प्रवर्ग | ० | ०१ | ०१ |
| ३ | अनुसूचित जमाती प्रवर्ग | ० | ०१ | ०१ |
| ४ | इतर मागास प्रवर्ग | ०१ | ० | ०१ |
| ५ | अल्पसंख्यांक प्रवर्ग | ०१ | ० | ०१ |
| ६ | विकलांग/दिव्यांग प्रवर्ग | ० | ०१ | ०१ |
| | एकूण | ०३ | ०५ | ०८ |

**निवडणूक निर्णय अधिकारी**
**महाराष्ट्र पथविक्रेता (उपजीविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम २०१६ अन्वये मुरूड जंजिरा नगरपरिषद**

## जाहीर नोटीस

दिनांक १७/०८/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचित करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे मोहिली तर्फे वासरे, ता. कर्जत, जि. रायगड येथील,

| सर्व्हे / हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| ३२/१/ब | ०-६१-६० पैकी लिहुन देणार यांचे मालकी हक्काची ०-६-०० गुंठे क्षेत्राची मिळकत | ६-१० |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक यांचे कडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमणध्वनी क्र.०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

माझे आशील यांनी दिलेल्या माहितीवरून व सांगितलेवरून त्यांचे तर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते खालीलप्रमाणे:-

मौजे -वरसोली, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्र. व उपविभाग ४८/१ एकूण क्षेत्र २.७९.५० (आर.चौ.मी), आकारणी २७.९५ (रु.पैसे) ही बिनशेती मिळकत विद्यमान मालक श्री. हर्षानंद धनंजय कोचरेकर यांजकडुन जाण्या येण्याच्या रस्त्याच्या हक्कासह माझे अशिलांनी विकत घेण्याबाबत बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी माझे आशिलांस दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, वारसा हक्क, वहीवाटीचे हक्क, कुळ हक्क वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार खरेदीदार यांचे वकील यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांचे मुदतीत रजिस्टर पोस्टाने सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजुन माझे आशील विद्यमान मालकांबरोबर पुढील व्यवहार ठरवून खरेदीखत पुर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : १८/०८/२०२६

**(ॲड.परेश एम. घरत)**
तळमजला, अशोका शॉपींग सेंटर,
एस.टी. स्टॅंड जवळ, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड ४०२२०१
९८५०४८१२३४

## जाहीर नोटीस

दिनांक १७/०८/२०२६

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, श्री गुरुनाथ नरहरी म्हसे यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील

| सर्व्हे/हिस्सा क्र. | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|
| २०/४/ड | १-१२-०० पैकी लिहून देणार यांच्या हिश्यांची संपुर्ण मिळकत ०-२९-०० गुंठे क्षेत्राची मिळकत | ०-४५ |

ची शेतजमीन मिळकत विद्यमान मालक श्रीमती आरती नागराज नल्लु यांचेकडून कायम स्वरुपी खरेदी करावयाची ठरविलेली आहे. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे. तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतीमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलाही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्टा, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचे कडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त शेतजमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशिर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकत संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहिर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणे प्रमाणे जाहिर नोटीस आहे.

**ॲड.प्रमोद नथुराम सुर्वे**
रा.मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमनध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे खाड्याचापाडा, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक दिलीप नारायण थेटे यांचेकडून मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| ८ | २ | ३-५५-००<br>पैकी विक्री केलेले क्षेत्र<br>१-३०-०० | १-३८ |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक :- १८/०८/२०२६

**ॲड. समीर आर. सावंत**
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं. ०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत,
ता.कर्जत,जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली भात/रापड जमिन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमुद असलेल्या मालकांकडून आमचे अशिल यांनी कायमचे खरेदीखताद्धारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधीत व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात खालील नमुद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन ७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचाही हरकत न आल्यास आमचे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या भात/रापड जमिन मिळकत मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पुर्ण करतील. मुदत बाह्यहरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**मौजे :- कडाव, ता. कर्जत, जि. रायगड येथील मिळकत :-**

| मालकांचे नाव | स.नं./ हिस्सा नं. | क्षेत्र : हे.आर.प्रति | आकार |
|---|---|---|---|
| १.जयकुमार धनराज धड्डा<br>२. नरेंद्रकुमार धनराज धड्डा<br>३. निहाल धनराज धड्डा | १२/२/अ | ०-३८-७०<br>पोटखराबा ०-०१-३०<br>०-४०-०० | २.९१ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : सदनिका क्रं. १०८,
पहिला मजला, विंग बी, लक्ष्मी अपार्टमेंट
बांधिवली, ता.कर्जत, जि.रायगड.
ठिकाण: कर्जत

सही /-
**ॲड. सुर्यकांत भाऊ मसणे**
दिनांक : १८/०८/२०२६
मो.नं. ९९२२१५५१५३

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटिसीने कळविण्यात येते की, मायादेवी अरुण कदम रा. तळदेव, शेडाशी, पो.रानसई, ता.पेण, जि.रायगड येथील रहिवासी असून यांच्या मालकीची जमिनी शेडाशी कातकरीवाडी ता.पेण, जि.रायगड येथे असून मी. स्वतः आशुतोष किसनलाल बियानी विकत घेण्याचे ठरविले आहे, त्याचे वर्णन खालीलप्रमाणे....

| गाव | मालक | गट क्रमांक व उपविभाग | एकूण क्षेत्र हे.आर. | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| शेडाशी कातकरीवाडी | मायादेवी अरुण कदम | १८/८ | ०.२६.०० | ०.१८ |

तरी वर वर्णन केलेली जमिन मिळकत मी स्वत: कायमस्वरूपी विकत घेत आहे. तरी वरील मिळकतीच्या बाबतीत कोणाचीही कुळ, वहीवाट, ताबा, बयाणा पावती, साठेकरार, खरेदीखत, गहाणखत, बोजा, भाडेपट्टा, मृत्युपत्रातील दान, जप्ती, लीज अथवा अन्य प्रकारची कायदेशीर हक्क हितसंबंध असल्यास ही नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसाच्या आत माझ्याकडे लेखी पुराव्यानिशी येवून माझी खात्री पटवून द्यावी. विहीत मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास मी स्वत: जमिन मिळकतीचे रजिस्टर्ड खरेदीखत करेन व मागाहुन येणारी कोणतीही हरकत माझ्यावर बंधनकारक राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

पेण
दिनांक : १८/०८/२०२६

**आशुतोष किसनलाल बियानी**
६०६ जीवन, विहार ५ मानव,
मंदिर रोड, मलाबार हिल, मुंबई
मलाबार हिल, महाराष्ट्र ४००००६
फोन नंबर ९००४६०००४६

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public at large that Mr. Saurabh Sudhir Gadkari, claiming to be the lawful owner of the property described below, has agreed to sell the same to my client Mr. Mujahid Shakeel Ansari and has authorized my client to invite claims and objections in respect thereof.

Any person, firm, institution, authority or entity having any right, title, interest, claim, demand, charge, lien, mortgage, lease, tenancy, encumbrance or objection of whatsoever nature in respect of the said property shall submit the same in writing, along with supporting documents, to the undersigned within 15 days from the date of publication of this Notice.

If no such claim or objection is received within the aforesaid period, the transaction shall be proceeded with on the basis that there is no known subsisting claim or objection, subject to verification of title and applicable law.

**PROPERTY DESCRIPTION:**

Agricultural land bearing Gat No. 35, Hissa No. 10, admeasuring approximately 0.10 Hectare (1,000 sq. mtrs.), situated at Village Mulgaon Tarf Vasare, Taluka Karjat, District Raigad, Maharashtra, standing recorded in the relevant revenue records in the name of Mr. Saurabh Sudhir Gadkari, more particularly described in the relevant title and revenue documents.
Date: 18/08/2026

**GANESH AMBADAS NIKALKE**
Advocate for Mr. Mujahid Shakeel Ansari
Advocate, Bombay High Court
Room No. 36, A. A. W. I., 1st Floor,
Bombay High Court, Fort, Mumbai-400 032
Mob: 9321111143
Email: ganesh_nikalje@rediffmail.com

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या नोटीसीद्वारे कळविण्यात येते की मौजे - मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड, येथे असलेल्या खालील परिशिष्ठमध्ये वर्णनीलेल्या जमीन मिळकती आमचे अशील सौ.वृषाली वासुदेव खानविलकर, यांनी या जमीन मिळकतींचे विद्यमान मालक श्री.संभाजी पांडुरंग मचाले, यांचेकडून कायम खरेदी करायचे ठरवले आहे.

**मौजे - मिरचोली, ता. कर्जत, जि. रायगड येथील जमिन मिळकती**

| गाव | सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| मिरचोली | २५/४/ब | ०.१५.३० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे ताबेकब्जात व नावे असलेले ०.३.९० इतके क्षेत्र विकत देणेचे ठरलेले आहे. | ०.५४ |
| मिरचोली | २६/१७ | ०.३६.०० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार यांचे ताबेकब्जात व नावे असलेले ०.१६.१० इतके क्षेत्र विकत देणेचे ठरलेले आहे. | ०.१८ |

सदरहू जमीन मिळकती या त्या मिळकतींचे विद्यमान मालक यांच्या मालकीची व कब्जा वहिवाटीच्या आहेत असे ते सांगतात आणि तसे जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावरून सुद्धा ते दिसून येत आहे. सदर जमीन मिळकती त्यांच्याकडून आमचे अशिलांनी सर्व हक्कासह कायमस्वरूपी खरेदीखत द्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर जमीन मिळकतींचे विषयी कुणाचा गहाण, दान, साठेकरार, बक्षीस, फरोक्तखत, लीज, हक्क, बोजा वगैरे किंवा कुणालाही कुठल्याही प्रकारची हरकत असल्यास तशी लेखी हरकत, पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील पत्त्यावर पोहोचवावी. वरील मुदतीत कुणाची कुठल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरहू जमीन मिळकती निर्वेध असल्याचे समजून सदरहू जमिनींच्या विक्रीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर कोणतीही हरकत ऐकली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कर्जत दि. १८/०८/२०२६

हरकत खालील पत्त्यावर नोंदवावी
**ॲड. संदिप मारूती घरत**
ऑफिस :- श्री. साई सावली, सो.लि. दुसरा मजला,
ब्लॉक नं. १०, कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता. कर्जत, जि. रायगड,
पिन - ४१०२०१. मो.९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

## निवडक

### हिटमॅनच्या फॅनची कमाल!

**नवी दिल्ली :** भारताचा स्टार फलंदाज रोहित शर्मा हा आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील सर्वात लोकप्रिय खेळाडूंपैकी एक आहे. रोहित शर्माच्या जबरा फॅनचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. जो १८०० किमी सायकलने प्रवास करुन मुंबईत रोहितला भेटण्यासाठी आला आहे. भेटीनंतर त्याने रोहितला एक खास गिफ्ट देखील दिलं आहे. ओडिशा येथे राहणारा सुनील नावाच फॅन १८०० किमी सायकलने प्रवास करुन रोहित



शर्माला भेटण्यासाठी आणि त्याला शुभेच्छा देण्यासाठी मुंबईत दाखल झाला आहे. सुनील ओडिशा येथे क्रेन ऑपरेटरचं काम करतो. त्याचे वडील शेतकरी आहेत. त्याची एकच ईच्छा होती, ती म्हणजे आपला आवडता खेळाडू रोहित शर्माला भेटायचं आणि त्यालला आगामी वनडे वर्ल्डकप २०२७ स्पर्धेसाठी शुभेच्छा द्यायचं. रोहितची भेट घेऊन त्याला आगामी वर्ल्डकप स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. माध्यमातील वृत्तानुसार, सुनीलने मेहनत करुन ८००० जमवले आणि सायकल खरेदी केली. १५ दिवसाआधी तो तो मुंबई गाठण्यासाठी ओडिशाहून सायकल घेऊन निघाला. सुनीलने सांगितलं की,या प्रवासादरम्यान अनेकांनी त्याला २०० आणि ५०० रुपये देऊन मदत करण्याचा प्रयत्न केला. पण त्याने कोणाकडूनही पैसे घेतले नाहीत. या प्रवासादरम्यान अनेक अडथळे आले, पाऊस आला, जंगलातून प्रवास करावा लागला. पण त्याने माघार घेतली नाही. आपल्या आवडत्या खेळाडूला भेटण्याची जिद्द मनात ठेवून तो पुढे चालत राहिला. मुंबईत पोहोचल्यानंतर त्याने रोहित शर्माची भेट घेतली.

### द्रविड-पुजाराच्या क्लबमध्ये देवदत्त

**मुंबई :** गॉलच्या आंतरराष्ट्रीय मैदानावर श्रीलंकेविरुद्ध खेळल्या जात असलेल्या पहिल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या डावात भारतीय फलंदाज देवदत्त पडिक्कलने आपल्या कसोटी कारकिर्दीतील पहिलेवहिले शतक झळकावले. पण तो एवढ्यावरच थांबला नाही; सामन्याच्या दुसऱ्या दिवशी त्याने १५० धावांचा टप्पाही पार केला. पडिक्कलने केले संधीचे सोनेभारतीय संघाचा आघाडीचा फलंदाज देवदत्त पडिक्कलने श्रीलंकेविरुद्धच्या पहिल्या कसोटीत आपली छाप पाडली. दुखापतीमुळे संपूर्ण मालिकेतून बाहेर पडलेल्या साई सुदर्शनच्या जागी पडिक्कलला तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजीची संधी मिळाली आणि त्याने या संधीचे सोने केले. पडिक्कलने पहिल्या दिवशी शतक ठोकले होते, जे त्याचे आंतरराष्ट्रीय कारकिर्दीतील पहिलेच शतक ठरले. दुसऱ्या दिवशीही त्याने आपली सुरेख फलंदाजी सुरू ठेवत १५० धावांचा टप्पा पार केला. यादरम्यान त्याने राहुल द्रविड आणि चेतेश्वर पुजारा यांच्या कामगिरीशी बरोबरी साधली. श्रीलंकेविरुद्ध तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना १५० हून अधिक धावा करणारा पडिक्कल हा तिसरा भारतीय फलंदाज ठरला आहे.मात्र, देवदत्त पडिक्कलच्या रूपाने भारताला पाचवा धक्का बसला. प्रभात जयसूर्याने त्याला बाद केले. पडिक्कलने २३० चेंडूंत १५ चौकार आणि १ षटकाराच्या मदतीने १६७ धावांची दमदार खेळी केली. याआधी पडिक्कलने भारताचे माजी कर्णधार सौरव गांगुली यांच्या एका विक्रमाचीही बरोबरी केली होती. २१ व्या शतकात भारतासाठी तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करताना कसोटी शतक झळकावणारा तो दुसरा डावखुरा फलंदाज बनला आहे.

### ठाणे स्मार्ट सिटी मॅरेथॉनचे आयोजन

**ठाणे :** लोक आश्रमच्या वतीने ठाणे जिल्हा हौशी ॲथलेटिक्स संघटनेच्या मान्यतेने येत्या रविवारी २३ ऑगस्टला ठाणे जिल्हास्तरीय ठाणे स्मार्ट सिटी मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. ठाणे पूर्व भागातील अष्टविनायक चौकातून सुरू आणि तेथेच शेवट होणाऱ्या या शर्यतीमध्ये पुरुष-महिला गट (१०किमी), १८ वर्षे मुले-मुली (७ किमी), १५ वर्षे मुले-मुली (५ किमी), १२ वर्षे मुले-मुली (३ किमी) अशा अंतराच्या शर्यतींचा समावेश आहे. प्रत्येक शर्यतीतील पहिल्या दहा क्रमांकांच्या विजेत्यांना रोख बक्षिसांनी गौरवण्यात येणार आहे. वेग, तंत्रज्ञान आणि अचूकतेचा भन्नाट संगम साधत आयआयटी मुंबई रेसिंग टीमने पोर्तुगालमधील पॅस्टेलो ब्रांको येथे झालेल्या फॉर्म्युला स्टुडंट्स (एफएस) स्पर्धेत दणदणीत यश मिळवले. सर्वसाधारण श्रेणीत इलेक्ट्रिक कार आणि ड्रायव्हरलेस कार रेसिंग या दोन्ही प्रकारांत प्रथम क्रमांकाचे पोडियम स्थान पटकावत आयआयटी मुंबईने आंतरराष्ट्रीय रेसिंग ट्रकवर हिंदुस्थानची तांत्रिक ताकद दाखवून दिली. या ऐतिहासिक कामगिरीत राहिलचेही मोलाचे योगदान राहिले. २०२५-२६ मोसमासाठी त्याने चीफ ऑफ ऑपरेशन्स (सीओओ) आणि चीफ टेक्नॉलॉजी ऑफिसर (सीटीओ) या ड्राइव्हट्रेन ॲण्ड व्हील असेंब्ली अशी दुहेरी जबाबदारी सांभाळली. शिक्षण आणि मोटरस्पोर्ट्सची सांगड घालत मिळवलेले यश आयआयटी मुंबईसाठी अभिमानाचे आहे.

### स्पेननेही ऑस्ट्रेलियाला क्रिकेटमध्ये पछाडलं

**मुंबई :** ऑस्ट्रेलिया क्रिकेट सध्या वाईट काळातून जात आहे. त्यामुळेच लहान संघसुद्धा त्यांच्याविरुद्ध आपली ताकद दाखवत आहेत. ते त्यांच्या खेळावर आणि विक्रमांवर मात करत आहेत. बांगलादेशने मायदेशात ऑस्ट्रेलियाला कसोटी सामन्यात हरवून जो इतिहास रचला, तो सर्वांनी पाहिलाच आहे. पण स्पेनने ऑस्ट्रेलियाला मागे टाकले आणि आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील त्यांचा विश्वविक्रम मोडला आहे. हा विक्रम सर्वाधिक सलग विजयांच्या विक्रमाशी संबंधित आहे. स्पेन आता आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक सलग विजय मिळवणारा संघ बनण्याचा मान मिळवला आहे आणि या संदर्भात ऑस्ट्रेलियाचा जागतिक विक्रम मोडला आहे. स्पेनने २०२३ ते २०२६ या कालावधीत २१ आंतरराष्ट्रीय सामने जिंकून एक विश्वविक्रम प्रस्थापित केला. हे सर्व सामने टी २० आंतरराष्ट्रीय सामने होते. स्पेनने १५ ऑगस्ट २०२६ रोजी आइल ऑफ मॅनला पराभूत करून ऑस्ट्रेलियाचा विश्वविक्रम मोडला. सलग २० सामने जिंकण्याचा जागतिक विक्रम ऑस्ट्रेलियाच्या नावावर आहे, जो त्यांनी २३ वर्षांपूर्वी २००३ मध्ये प्रस्थापित केला होता. स्पेनला २०१९ मध्ये आयसीसीकडून टी २० आंतरराष्ट्रीय सामन्यांची परवानगी मिळाली आणि तेव्हापासून त्यांनी खेळलेल्या ५१ टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांपैकी ४२ सामने जिंकले आहेत, केवळ आठ गमावले आहेत आणि एक सामना रद्द झाला आहे. स्पेन सध्या २०२८ टी २० विश्वचषकासाठीच्या युरोप सब रिजनल क्वालिफायर सी स्पर्धेत खेळत आहे, जिथे १४ ऑगस्ट रोजी त्यांचा सामना फिनलंडशी झाला. स्पेनने हा सामना ८ गडी राखून जिंकला आणि या सामन्यात त्यांना १३१ धावांचे टार्गेट मिळाले होते.

## चौल श्री रामेश्वर पुष्करणीत जलतरण स्पर्धा

# युवा जलतरणपटूंची चमकदार कामगिरी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून दरवर्षीप्रमाणे यंदाही रामेश्वर मित्र मंडळाच्या वतीने चौल येथील श्री रामेश्वर पुष्करणीत भव्य जलतरण स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. १५ ऑगस्ट रोजी दुपारी ३ वाजता झालेल्या या स्पर्धेला जलतरणपटू, क्रीडाप्रेमी, ग्रामस्थ व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. विविध वयोगटांतील स्पर्धकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेत आपल्या जलतरण कौशल्याचे दर्शन घडविले.



स्पर्धेतील गट क्रमांक १ मुले ओंडे बांधून या प्रकारात श्रीयांश अमोल म्हात्रे यांनी प्रथम, वंश रोहित कड यांनी द्वितीय, तर ओजस नितीन राऊत यांनी तृतीय क्रमांक मिळविला. गट क्रमांक २ मुले डबल फेरीमध्ये दिवांशू कुथे प्रथम, हर्ष योगेश ठाकूर द्वितीय, तर श्रावण विलास इंद्रे तृतीय ठरले.

गट क्रमांक ३ मुले सिंगल फेरीमध्ये रियांश मनोज ठाकूर प्रथम, सोहम सुनील घरत द्वितीय व अद्वैत विजय वाघमारे तृतीय; तर गट क्रमांक ४ मुले डबल फेरीमध्ये सार्थक मारुती इंद्रे प्रथम, मयूष मनोज ठाकूर द्वितीय व अंश भोईर तृतीय ठरले.

गट क्रमांक ५ मुली ओंडे बांधून या प्रकारात आदिश्री हेमंत जाधव प्रथम, ओवी प्रशांत किवळेकर द्वितीय व श्रीषा रोहित पाटील तृतीय; तर गट क्रमांक ६ मुले डबल फेरीमध्ये क्रिश विजय कुथे प्रथम, वेद मंगेश कुथे द्वितीय व मनन जीवन घसे तृतीय क्रमांकावर राहिले.

गट क्रमांक ७ मुले सिंगल फेरीमध्ये आयुष शर्मा प्रथम, अर्णव बळीराम पाटील द्वितीय व यश शर्मा तृतीय; तर गट क्रमांक ८ मुले ओंडे बांधून आराध्य आशिष ठाकूर प्रथम, रुद्र विलास जाधव द्वितीय व सानिध्य सुचित वर्तक तृतीय ठरले.

गट क्रमांक ९ मुली सिंगल फेरीमध्ये तीर्था प्रमोद वाजंगी प्रथम, प्रेषिता पाटील द्वितीय व पलक पाटील तृतीय; तर गट क्रमांक १० मुले सिंगल फेरीमध्ये अर्णव प्रज्वल सकपाळ प्रथम, रुद्र दि. टिवळेकर द्वितीय व जय जितेंद्र म्हात्रे तृतीय ठरले.

गट क्रमांक ११ मुली ओंडे बांधून श्रीशा संदेश वर्तक प्रथम, ओवी दिलीप धुमाळ द्वितीय व कृतिक आशिष राऊत तृतीय; तर गट क्रमांक १२ श्री रामेश्वर गटमध्ये विनायक यशवंत नाईक प्रथम, जितेंद्र रामचंद्र जाधव द्वितीय व ओमकार प्रशांत जाधव तृतीय क्रमांकावर राहिले.

गट क्रमांक १३ मुले सिंगल फेरीमध्ये हर्षवर्धन म्हात्रे प्रथम, संचित स्वप्नील कवळे द्वितीय व निश नागेश पेरेकर तृतीय; तर गट क्रमांक १४ मुली सिंगल फेरीमध्ये प्रेक्षिका पाटील प्रथम, सई पिलणकर द्वितीय व आरोही राऊत तृतीय ठरल्या.

स्पर्धेतील सर्वांचे लक्ष वेधून घेणाऱ्या गट क्रमांक १५ अंतिम फेरी (तीन फेऱ्या)मध्ये दिवांशू कुथे यांनी प्रथम, रोहित कुथे यांनी द्वितीय, प्रेम पाटील यांनी तृतीय, तर सार्थक इंद्रे यांनी चौथा क्रमांक पटकावला.

स्पर्धेच्या आयोजनासाठी भाग्यश्री ज्वेलर्स, नीलेश खोत, जितेंद्र जाधव आणि सिद्धांत वार्डे यांच्याकडे स्पर्धकांची नोंदणी करण्यात आली होती. स्पर्धेतील विजेत्या खेळाडूंचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करून गौरव करण्यात आला.

### विनोद कांबळीच्या आयुष्यावर बायोपिक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताचे माजी क्रिकेटपटू विनोद कांबळी यांचे जीवन आता चित्रपटातून नव्हे, तर वेब सीरिजच्या माध्यमातून प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. दिग्दर्शक अभिजीत देशपांडे त्यांच्या जीवनावर आधारित कांबळी नावाची एक हिंदी सीरिज काढणार आहे. ही सीरिज एका डिजिटल प्लेटफॉर्मवर प्रदर्शित होईल. या मालिकेची निर्मिती २०० नॉट आऊट प्रोडक्शन्सचे रवी भागचंदका करत आहेत. अभिजीत देशपांडे यांनी स्पष्ट केले की, त्यांनी २०१९ मध्ये कांबळी यांच्या जीवनावर सर्च आणि कथालेखन सुरू केले. सुरुवातीला यावर एक मराठी चित्रपट बनवण्याची योजना होती, परंतु सर्च दरम्यान त्यांच्या लक्षात आले की कांबळी यांची जीवनकथा इतकी व्यापक आहे की ती एकाच चित्रपटात मांडणे कठीण होईल. त्यामुळे, यावर आधारित वेब सीरिज बनवण्याचा निर्णय घेण्यात आला.या मालिकेत विनोद कांबळी यांची क्रिकेट कारकीर्द तसेच त्यांचे वैयक्तिक आयुष्य आणि संघर्ष दाखवण्यात येईल.





■ अलिबाग तालुक्यातील खंडाळे येथील महावीर ग्रामस्थ मंडळाने आयोजित केलेल्या कुस्ती स्पर्धेत एका मल्लाने प्रतिस्पर्ध्याला चितपट करण्यासाठी टाकलेला डाव टिपला आहे छायाचित्रकार समीर मालोदे यांनी.

#### दिवेआगर सरपंच चषक नारळ फोडी स्पर्धा

### श्रीवर्धनच्या विक्रांत फुटाणकरने जिंकली

**। श्रीवर्धन । वार्ताहर ।**

दिवेआगर येथील म.गो. लिमये विद्यामंदिर मैदानात १६ ऑगस्ट रोजी रंगलेल्या भव्य सरपंच चषक नारळ फोडी स्पर्धेत श्रीवर्धनच्या विक्रांत फुटाणकर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांकाचा चषक व रोख रु. ११,००० चे पारितोषिक पटकावले. द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक रु. ७,००० व चषक श्रीवर्धनचे सचिन फुटाणकर यांनी पटकावले, तर उत्कृष्ट फटकेबाज म्हणून नांदगाव मुरुड येथील अनिकेत माळी यांना चषकाने सन्मानित करण्यात आले. या स्पर्धेत चौल, रेवदंडा, नागाव, मुरुड, दिवेआगर आणि श्रीवर्धन अशा विविध भागांतील सोळा संघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता.



विजयी स्पर्धकांना दिवेआगरचे सरपंच विजय तोडणकर यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना सरपंच विजय तोडणकर म्हणाले, नारळ फोडी हा आपल्या कोकणातील संस्कृती आणि परंपरेचा अविभाज्य भाग आहे. आधुनिकतेच्या प्रवाहात अशा पारंपरिक खेळांना पुनरुज्जीवित करणे आणि तरुण पिढीला एकत्र आणणे हाच या सरपंच चषकाचा मुख्य उद्देश आहे.रायगड जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून आलेल्या खेळाडूंचा उत्साह आणि शिस्तबद्ध खेळ पाहून अत्यंत आनंद झाला. भविष्यातही या पारंपरिक खेळांना प्रोत्साहन देण्यासाठी अशा स्पर्धा मोठ्या प्रमाणावर भरवल्या जातील.

### दिल्लीत रंगणार शटल वॉर

**नवी दिल्ली :** १७ वर्षांनंतर बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धा भारतात आयोजित केली जाणार आहे. जगातील अव्वल बॅडमिंटनपटू या प्रतिष्ठित विजेतेपदासाठी राजधानी दिल्लीत आपले कौशल्य दाखवतील. इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर या मोठ्या स्पर्धेचे सामने खेळले जाणार आहेत.

२००९ नंतर भारत प्रथमच बीडब्ल्यूएफ जागतिक अजिंक्यपद स्पर्धेचे आयोजन करत आहे. या सात दिवसीय स्पर्धेत एकेरी प्रकारात ६४ पुरुष आणि ६४ महिला खेळाडू सहभागी होतील. याशिवाय, तीन दुहेरी प्रकारांमध्ये ४८ जोड्याही विजेतेपदासाठी स्पर्धा करतील.

पहिल्या दिवशी, पुरुष आणि महिला एकेरीच्या ड्रॉच्या वरच्या अर्ध्या भागातील सामने खेळले जातील. जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताची कामगिरी उत्कृष्ट राहिली आहे. देशाने १९८३ मध्ये पहिल्यांदा पदक जिंकले, जेव्हा प्रकाश पदुकोण यांनी कांस्य पदक जिंकले होते.

### पंतने मोडला गिलख्रिस्टचा रेकॉर्ड

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारताचा संघ सध्या श्रीलंका दौऱ्यावर आहे. दोन्ही संघांमध्ये २ कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला कसोटी सामना गॉलच्या मैदानावर सुरु आहे. ऋषभ पंत २७ धावांवर नाबाद परतला. यादरम्यान पंतने ६८ व्या षटकात फलंदाजी करताना खणखणीत षटकार खेचला. या षटकाराह त्याने ऑस्ट्रेलियाचा माजी फलंदाज ॲडम गिलख्रिस्टचा रेकॉर्ड मोडून काढला आहे.

या सामन्यातही त्याने काही मोठे फटके मारले. तर झाले असे की, श्रीलंकेकडून ६८ वे षटक टाकण्यासाठी प्रभात जयसूर्या गोलंदाजीला आला. यादरम्यान पंतने लाँग ऑनच्या वरुन खणखणीत षटकार खेचला. यासह ऋषभ पंत हा परदेशात फलंदाजी करताना सर्वाधिक षटकार खेचणाऱ्या फलंदाजांच्या यादीत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे.

### आशियाई खेळांसाठी अफगाणचा नवीन संघ

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

अफगाणिस्तानने जपानमध्ये होणाऱ्या आशियाई खेळांसाठी संघ जाहीर केला आहे. टॉप ऑर्डर फलंदाज दरविश रसूलीला कर्णधार बनवण्यात आले आहे. संघात ६ असे खेळाडू आहेत, ज्यांनी अजून आंतरराष्ट्रीय क्रिकेट खेळलेले नाही. तर, ५ खेळाडूंकडे १० पेक्षा कमी आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे. संघात करीम जनत आणि नजीबुल्लाह जादरानसारखे अनुभवी खेळाडू देखील आहेत. यांच्याशिवाय नंग्यालिया खरोटेकडे १० पेक्षा जास्त आंतरराष्ट्रीय सामन्यांचा अनुभव आहे. खरोटे संघाच्या फिरकी आक्रमणाचे नेतृत्व करू शकतो. अफगाणिस्तानने आपल्या घरगुती टी-२० स्पर्धेत शपगीजा क्रिकेट लीगमध्ये चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना संघात समाविष्ट केले आहे. मागील हंगामात दुसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक धावा करणाऱ्या मोहम्मद अकरमला संघात स्थान मिळाले आहे. त्यांच्याशिवाय स्पर्धेत दुसऱ्या क्रमांकावर सर्वाधिक स्ट्राइक रेट असलेल्या खालिद तनीवाल देखील संघाचा भाग आहेत. दोन कसोटी सामने खेळलेल्या अष्टपैलू इस्मत आलमचीही आशियाई क्रीडा स्पर्धेसाठीच्या संघात निवड झाली आहे. तो च्या मागील हंगामात प्लेअर ऑफ द टूर्नामेंट ठरला होता. त्याने २९४ धावा केल्या होत्या आणि त्याचा स्ट्राइक रेट १६८ होता. गोलंदाजीमध्ये त्याने ९ विकेट घेतल्या होत्या आणि त्याची सरासरी १६.७७ होती. अंडर-१९ विश्वचषकाच्या उपांत्य फेरीत भारताच्या विरोधात शतक झळकावणाऱ्या फैसल शिनोजादाचाही संघात समावेश करण्यात आला आहे.

#### ट्रेंट रॉकेट्सला ५ विकेटने हरवले | सिफर्टच्या ७२ धावा, डॉसनच्या सिक्सरने विजय

## मँचेस्टर सुपर जायंट्स प्रथमच द हंड्रेड चॅम्पियन

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मँचेस्टर सुपर जायंट्सने प्रथमच द हंड्रेड मेन्स स्पर्धेचे विजेतेपद पटकावले आहे. लॉर्ड्सवर खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात संघाने ट्रेंट रॉकेट्सने दिलेल्या १५८ धावांचे लक्ष्य १९.३ षटकांत ५ गडी गमावून पूर्ण केले. टिम सीफर्टने ३८ चेंडूंमध्ये ७२ धावांची खेळी करून विजयाचा पाया रचला, तर लियाम डॉसनने शेवटच्या चेंडूवर षटकार मारून संघाला विजेतेपद मिळवून दिले.




मँचेस्टरच्या विजयात न्यूझीलंडचा टिम सीफर्ट सर्वात मोठा हिरो ठरला. त्याने ३८ चेंडूंमध्ये ७२ धावा केल्या. या खेळीत ७ षटकार आणि ४ चौकार समाविष्ट होते. सीफर्टने अवघ्या २३ चेंडूंमध्ये अर्धशतक पूर्ण केले. त्याने पॉल वॉल्टरसोबत पहिल्या विकेटसाठी वेगवान सुरुवात करत संघाला मजबूत स्थितीत आणले.

सीफर्ट बाद झाल्यानंतर, मँचेस्टरचा स्कोअर १३६ होता. संघाला २३ चेंडूंत २३ धावांची गरज होती. यानंतर ट्रेंट रॉकेट्सने पुनरागमनाचा प्रयत्न केला. मोहम्मद आमिरने सलग चेंडूंवर हेनरिक क्लासेन आणि मायकेल ब्रेसवेलला बाद केले.

मँचेस्टरला शेवटच्या ३ चेंडूंमध्ये ३ धावांची गरज होती. बेन सँडरसनच्या पुढील दोन चेंडूंवर धावा झाल्या नाहीत. यानंतर लियाम डॉसनने तिसऱ्या चेंडूवर मिड-विकेटवरून षटकार मारून सामना संपवला. मँचेस्टरने १९.३ चेंडूंमध्ये १६२/५ धावा करून ५ गडी राखून विजय मिळवला.

तत्पूर्वी, ट्रेंट रॉकेट्सने प्रथम फलंदाजी करताना १०० चेंडूंमध्ये ८ गडी गमावून १५८ धावा केल्या. एनेरिन डोनाल्डने १९ चेंडूंमध्ये ३८ धावांची सर्वात मोठी खेळी केली. लुईस ग्रेगरीने १६ चेंडूंमध्ये ३२ धावा केल्या, तर मिचेल सँटनरने नाबाद २० धावांचे योगदान दिले.मँचेस्टरकडून नूर अहमद सर्वात यशस्वी गोलंदाज ठरला. त्याने ३३ धावा देऊन ३ बळी घेतले. सोनी बेकरने ३४ धावा देऊन २ बळी घेतले. सीफर्ट ३३ धावांवर बाद होण्यापासून वाचले. त्याने चेंडू लेग साइडला बाउंड्रीच्या दिशेने मारला होता. फिन ॲलनने बाउंड्रीजवळ झेल घेण्याचा प्रयत्न केला आणि चेंडू मैदानाकडे परत फेकला, पण रिप्लेमध्ये त्याचा पाय बाउंड्री रोपला लागलेला दिसला.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)